❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २६७ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष
निर्भीड पत्रकारितेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून
दै. संध्याच्या
यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## थोडक्यात...

### दुष्काळ जाहीर करा : पवार

मुंबई : दैनिक संध्या

सध्या राज्यातील बहुतांश भागात पावसानं हजेरी लावलेली दिसत नाही. त्यामुळं शेतकऱ्यांची पिकं वाया गेली आहे. अनेक ठिकाणी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे मराठवाडा पाहणी दौऱ्यावर आहेत. यावेळी ते बांधावर जाऊन थेट पिकांची पाहणी करत शेतकऱ्यांशी संवाद साधत आहेत. शक्तीपीठ महामार्गासारख्या विकास कामांचा निधी दुष्काळग्रस्तांकडे वळवावा आणि तात्काळ मदत जाहीर करावी अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केलीय. खरिपात 75 टक्क्यांहून अधिक नुकसान झालं आहे. रब्बीचीही आशा मावळली आहे. पुढील दहा महिने शेतकऱ्यांना जगवण्याचे आव्हान असल्याचे पवार म्हणाले. खरिपात 75 टक्क्यांहून अधिक नुकसान झाले आहे. त्यामुळे रब्बी हंगामाचीही आशा संपली असून, जनावरांच्या चाऱ्यासह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पुढील दहा महिने सर्वसामान्य शेतकऱ्यांना कसे जगवायचे, हा मोठा प्रश्न आहे. त्यामुळे सरकारने तात्काळ मदत जाहीर करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते रोहित पवार यांनी केली आहे. रोहित पवार हे मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी दौऱ्यावर आहेत. धाराशिव आणि बीड जिल्ह्यांतील पाहणीनंतर ते लातूर जिल्ह्यातील किनगाव येथे दाखल झाले. यावेळी किनगावमधील शेतकऱ्यांनी रोहित पवार यांच्यासमोर आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या. प्रशासनाकडून पंचनामे आणि मदत मिळत नसल्याबद्दल शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

### यूक्रेनचा हजारो ड्रोनद्वारे रशियावर मोठा हल्ला

मुंबई : दैनिक संध्या

यूक्रेननं रशियावर आतापर्यंतचा सर्वात मोठा ड्रोन हल्ला केला आहे. यूक्रेननं हजारो ड्रोन रशियाच्या दिशेने सोडले. आतापर्यंतच्या माहितीनुसार रशियाकडून यूक्रेनचे 1900 ड्रोन रोखण्यात आले आहेत. यूक्रेनच्या ड्रोन हल्ल्यात 2 रशियन नागरिकांचा मृत्यू झाला आहे. रशियातील संसदीय निवडणुकींच्या अखेरच्या दिवशी मॉस्कोत ड्रोन हल्ले करण्यात आले. एका मोठ्या रिफायनरीचं नुकसान देखील झालं आहे. मॉस्कोचे महापौर सर्गेई सोब्यानिन यांनी ड्रोन हल्ल्यांसदर्भात माहिती दिली. यूक्रेनच्या अधिकाऱ्यांनी रात्रभर रशियाकडून कीव्हवर हल्ले करण्यात आल्याचं सांगितलं आहे. रशियाच्या हल्ल्यात चार जणांचा मृत्यू झाला, त्यात तीन लहान मुलांचा समावेश होता. रशिया आणि यूक्रेनकडून एकमेकांवरील हल्ले तीव्र केले जात आहेत. मॉस्कोचे गव्हर्नर आंद्रे वोरोब्योव यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटलं की ड्रोन हल्ला हा मोठा हल्ला होता. यूक्रेनच्या हल्ल्यात एका 44 वर्षीय महिलेचा आणि एका ज्येष्ठ नागरिकाचा मृत्य झाला आहे. वोरोब्योव यांनी म्हटलं की एका 21 मजली इमारतीला ड्रोनच्या हल्ल्यामुळं आग लागली, तिथून 400 लोकांना बाहेर काढण्यात आलं.

# देशातील सर्वात मोठी सोलर इकोसिस्टीम नागपुरात

## उद्योजकांनी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुख्यमंत्र्यांचा उद्योजकांसोबत संवाद**

■ नागपूर (दै. संध्या)

देशातील सर्वात मोठी सोलर मॉडेल इकोसिस्टीम नागपूर येथे आकार घेत आहे. येत्या दहा वर्षात नागपूर हे 'सोलर इकोसिस्टीम'चे हब होणार आहे, त्यामुळे उद्योजकांनी या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. अतिरिक्त बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रातील अवादा समूहाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट दिली तसेच सोलर मॉडेल निर्मितीची पहाणी केली, त्यानंतर उद्योजकांशी संवाद साधला.



अवादा उद्योग समूहाचे संस्थापक व अध्यक्ष विनीत मित्तल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विशेष मुलाखत घेतली, यावेळी राज्यातील पायाभूत सुविधा औद्योगिक विकास आणि मुंबईच्या भविष्यातील बदलांवर उद्योजकांसोबत मुख्यमंत्री यांनी संवाद साधला.

नवीन नागपूरच्या प्रकल्पाविषयी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, येथे स्मार्ट इंडस्ट्रीसाठी इकोसिस्टीम तयार करण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी पन्नास टक्के पेक्षा अधिक जागा अधिकृत झाली असून गुंतवणुकीलाही प्रोत्साहन मिळत आहे. देशातील पहिले सोलर मॉडेल अतिरिक्त बुटीबोरी क्षेत्रात तयार होत असून अवादा समूहाला त्यांच्या प्रकल्पाच्या विस्तारासाठी 250 एकर जागेची आवश्यकता आहे. ती देण्याची घोषणाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी केली. अतिरिक्त बुटीबोरी क्षेत्रात उद्योगांसाठी अधिग्रहित केलेली जमीन संपली असून तिसरी अतिरिक्त बुटीबोरी औद्योगिक वसाहत तयार करावयाची आहे, तसेच वर्धा जिल्ह्यातील नवीन औद्योगिक क्षेत्रासाठी भूसंपादन सुरू असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले. अवादा हा सोलर मॉडल बनवणारा सर्वात मोठा सुपर उद्योग असून, ॲडव्हान्स इंटिग्रेशन मुळे स्मार्ट मॉड्युलची निर्मिती होत आहे. भूमिपूजनानंतर वेगाने प्रकल्प पूर्ण झाला असून आज पाच हजार कामगार येथे काम करत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. उद्योजकांशी संवाद साधताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, स्टील उद्योगांच्या विकासाला प्रोत्साहन देण्यात येत आहे. उद्योजकांना स्वस्त वीज कशी उपलब्ध होईल या दृष्टीने प्रयत्न सुरू असून 2029 पर्यंत उद्योगांना स्वस्त वीज मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. सोलर बॅटरी स्टोरेजच्या दृष्टीने प्रयत्न सुरू असून 24 तास ऊर्जा उपलब्ध होईल यावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे उद्योगांना विजेचा प्रश्न राहणार नाही असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

गडचिरोली हे नवीन स्टील सिटी म्हणून उदयास येत असून तिथे चार लाख कोटींची गुंतवणूक आली आहे. बेल्जियमच्या कंपनीसोबत गडचिरोलीत ग्रीन स्टील बनवण्याचा सामंजस्य करार झाला असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले. समृद्धी महामार्गामुळे राज्याच्या मागास भागात विकासाला आवश्यक असलेल्या सुविधा निर्माण होत असून जेएनपीटी बंधनासोबतच वाढवण पोर्ट बंदर हे जगातील पहिल्या दहा बंदरांमध्ये समाविष्ट होणार आहे, येथून डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर द्वारे गडचिरोली पर्यंत पोहोचणे शक्य होणार आहे. यामुळे लॉजिस्टिक खर्च 60 टक्के पेक्षा कमी होईल आणि राज्याच्या विकासाला मोठी संधी उपलब्ध होणार आहे वाढवण बंदर येत्या तीन वर्षात पूर्ण होईल असा विश्वास व्यक्त करताना वाढवण हे ग्रीन पोर्ट असून सर्वात सक्षम राहणार आहे.

मुंबई येथील विमानतळावर खाजगी विमानांना कशा सुविधा देता येईल यासाठी विकासात व संबंधित यंत्रणांसोबत बोलून मार्ग काढण्यात येईल, असा विश्वास उद्योजकांना दिला. मुंबई झोपडपट्टी मुक्त करण्याच्या संदर्भात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, समूह विकास करण्याच्या दृष्टीने येथील रहिवाशांना पर्यायी घर देणे अथवा तीन वर्षाचे भाडे देत असल्यामुळे जागा मोकळी होण्यास मदत होत आहे येत्या दहा वर्षात मुंबई झोपडपट्टीमुक्त होईल असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

येत्या पाच वर्षात मुंबईचा चेहरा बदललेला असेल असा विश्वास व्यक्त करताना मुख्यमंत्री म्हणाले की, वांद्रे वर्सोवा मार्ग 2028 पर्यंत तर वर्सोवा ते भाईंदर नार्थ पोस्टल रोड मार्च 2029 पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष आहे. मुंबईतील 60 टक्के प्रवाशांसाठी वेस्टन एक्सप्रेसला एक पूर्णपणे सिग्नल फ्री समांतर मार्ग तयार केला जात आहे. अवघ्या 23 किलोमीटर साठी लागणारा दीड तासाचा वेळ या बोगद्यामुळे 15 ते 17 मिनिटांवरील हे काम पुढील चार वर्षात पूर्ण होईल, असेही त्यांनी सांगितले.

## भाजप स्वबळावर सोलापूर जिल्हा बँकेची निवडणूक जिंकेल

■ मुंबई (दै. संध्या)

सोलापूर जिल्हा बँकेच्या निवडणुकीची धामधूम सध्या जिल्ह्यामध्ये सुरू असून माजी आमदार रणजितसिंह मोहिते पाटीलही सध्या जिल्ह्यात फिरु लागल्याने जिल्हा बँकेची चर्चा जोरात सुरू झाली आहे. अशातच आज सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर जिल्हा बँक ही भाजप स्वबळावर लढवेल आणि जिंकेल असे सांगितले. त्याचबरोबर जे समविचारी सोबत येतील त्यांना सोबत घेऊन पुढे जाऊ असे संकेतही त्यांनी दिले. सोलापूर जिल्ह्यात जिल्हा बँकेची निवडणूक लढविण्यासाठी भाजपचे मजबूत नेते असून ते या निवडणुकी संदर्भात बसून ठरवतील आणि त्या पद्धतीने निवडणूक होईल. मी पालकमंत्री आणि शासनाचा प्रतिनिधी म्हणून जरी असलो तरी जिल्ह्यातील भाजप स्वबळावर जिल्हा बँक जिंकेल असा विश्वास पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केला आहे. सध्या पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. ही निवडणूक महायुती म्हणून लढवू आणि जिंकू असा दावा राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी केला आहे. गेल्यावेळी या दोन्ही जागांवर भाजपचा जोरदार पराभव झाला होता त्यानंतर आता पक्षाने मतदार नोंदणी पासून जोरदार तयारी केली आहे. अशावेळी ही निवडणूक महायुती म्हणून सामोरे जाण्याची तयारी सुरू आहे. मात्र ऐनवेळी पक्षाने निर्णय घेतल्यास स्वबळावर ही भाजप पदवीधर आणि शिक्षक ह्या दोन्ही मतदार संघात निवडणूक लढवेल आणि जिंकेल असाही दावा गोरे यांनी केला आहे. पुढचे संपूर्ण वर्ष सोलापूर जिल्ह्याला उजनी धरणावर अवलंबून राहावे लागणार आहे. त्यामुळं या पाण्याचे अत्यंत काटेकोरपणे नियोजन करावे लागणार असल्याचे मत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केले. पहिल्यांदा वर्षभर लागणारे पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठीचे पाणी आरक्षित करावं लागणार असल्याचे जयकुमार गोरे यांनी सांगितले. जिल्ह्याची परिस्थिती खूप काळजी करण्यासारखी असून आता उजनीचा प्रत्येक थेंब व्यवस्थित नियोजन केल्यानेच पुढचे संपूर्ण वर्ष पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणार नाही. सर्वात आधी पिण्याचे पाणी त्यानंतर जनावरांच्या पाण्याचे नियोजन करुन मगच शेतीसाठी पाणी द्यावे लागणार असल्याचेही गोरे यांनी सांगितले आहे.



■ मंत्री जयकुमार गोरेंना विश्वास, शिक्षक आणि पदवीधर निवडणुकीबाबतही मोठं वक्तव्य

■ शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघ निवडणूक, वेळ पडल्यास स्वबळावरचीही तयारी

## महाराष्ट्र सदनातील गणेशोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद

### सांस्कृतिक कार्यक्रमांसह खाद्य, कला व खरेदी दालनांवर झुंबड

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

राजधानी दिल्लीतील कोपर्निकस मार्गावरील महाराष्ट्र सदनात सुरू असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाला दिल्लीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. श्री गणरायाच्या दर्शनासाठी दररोज शेकडो भाविकांची उपस्थिती लाभत असून, संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला आहे. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसोबतच सदनात उभारण्यात आलेली खाद्य, कला व प्रदर्शन-विक्री दालने नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत.

'चव महाराष्ट्राची!' अंतर्गत पुरणपोळी व उकडीचे मोदक, 'कौशल्याला सलाम!' उपक्रमांतर्गत दिव्यांग बांधवांनी तयार केलेल्या हस्तकला वस्तू तसेच 'महाराष्ट्राच्या वस्त्रपरंपरेचा अनोखा ठेवा' या उपक्रमातील पैठणी, माहेश्वरी व इरकल साड्यांच्या दालनांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. याशिवाय महिला बचत गटांनी तयार केलेले चकली पीठ, ढोकळा पीठ, बारीक शेव, शेवभाजीसाठीची शेव आणि फराळी चिवडा तसेच वडापाव, चादरी आणि बांबू टॉवेल यांसारख्या विविध वस्तूंची प्रदर्शनी-विक्रीही नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. या उपक्रमातून महिला बचत गटांच्या कौशल्याला बाजारपेठ उपलब्ध करून देण्याबरोबरच महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन मिळत आहे. गेल्या काही दिवसांतील यशस्वी कार्यक्रमांनंतर आता 20 सप्टेंबरपासून होणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांकडे रसिकांचे लक्ष लागले आहे. 20 सप्टेंबर रोजी जनपथ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेंटर येथे वैशाली सामंत, ऋषिकेश रानडे आणि शरयू दाते यांच्या उपस्थितीत 'मराठी चित्रपट गीते' हा संगीत सोहळा रंगणार आहे. 21 सप्टेंबर रोजी 'पाक कलाकृती स्पर्धा' आणि साध्वी जेठवानी यांचा 'भरतनाट्यम' नृत्य कार्यक्रम होणार आहे. 22 सप्टेंबर रोजी राजेंद्र क्षीरसागर प्रस्तुत 'खेळ पैठणीचा' हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. 23 सप्टेंबर रोजी आकाशवाणी रंगभवन येथे प्रमिला लोदगेकर प्रस्तुत 'लावणी' कार्यक्रम, तर 24 सप्टेंबर रोजी मोनिका कपूर प्रस्तुत 'बॉली बीट्स' हिंदी-मराठी गायन व नृत्य सोहळा होणार आहे. गणेशोत्सवाची सांगता 25 सप्टेंबर रोजी होणार असून, दुपारी 3 ते सायंकाळी 7.30 या वेळेत जुन्या महाराष्ट्र सदनातून झांज पथकासह श्रींची भव्य विसर्जन मिरवणूक काढण्यात येणार आहे. उत्सवातील सर्व कार्यक्रम विनामूल्य असून, काही मोजक्या कार्यक्रमांसाठी ऑनलाइन नोंदणी अनिवार्य आहे. राजधानीतील महाराष्ट्रप्रेमी, गणेशभक्त आणि रसिकांनी महाराष्ट्र सदनातील गणेशोत्सवाला आवर्जून भेट देऊन श्रींचे दर्शन घ्यावे तसेच खाद्य, कला, संस्कृती आणि खरेदीच्या या महोत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन निवासी आयुक्त तथा सचिव डॉ. श्वेता सिंघल यांनी केले आहे.



# 'दिशा सालियान प्रकरणात सत्य बाहेर येईल'

## *छगन भुजबळांची पहिलीच प्रतिक्रिया; कुंभमेळ्यावरही दिली प्रतिक्रिया*

■ नाशिक (दै. संध्या)

दिशा सालियान प्रकरणावरून राज्यातील अनेक नेते प्रतिक्रिया देत असून, तिचे वडील सतीश सालियान यांनी सीबीआयला दिलेल्या जबाबात आदित्य ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचे नाव घेत त्यांच्यावर सातत्याने आरोप केले आहेत. सध्या सीबीआयकडून या प्रकरणाचा तपास सुरू असून काहींनी थेट आदित्य ठाकरेंवर आरोप केले आहेत. या सर्व घडामोडींवर भाष्य करताना मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले आहे की, हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट असून चौकशी करणाऱ्या संस्था त्यातील सत्य नक्कीच बाहेर आणतील.

छगन भुजबळ यांना दिशा सालियान प्रकरणावर प्रश्न विचारला असता त्यांनी म्हटले की, हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट असून चौकशी करणाऱ्या संस्था आणि त्यातील सत्य नक्कीच बाहेर आणतील, असा विश्वास भुजबळ यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, दिशाचे वडील सतीश सालियान हे त्यांच्या वकिलांसह ठाकरेंच्या मातोश्रीवर गेले होते. यावेळी त्यांच्या वकिलांनी ठाकरेंच्या वकिलांना नोटीस दिली. यात आदित्य ठाकरे यांच्यावर 500 कोटींच्या अब्रूनुकसानीचा दावा ठोकण्यात आला आहे.



पुढे कुंभमेळाव्याच्या बैठकीवर बोलताना छगन भुजबळांनी म्हटले की, त्यांच्या बैठकीला मला जाता आले नाही. अधिकारी येऊन मला सांगणार आहेत. त्यांनी जबाबदारी घेतली आहे, ते जबाबदारी पार पाडणार आहेत. सर्व काम वेळेत आणि चांगली होणार आहेत. जे ठरले आहे तसे झाले पाहिजे. छगन भुजबळ म्हणाले, पर्यटक मोठी अर्थव्यवस्था आहे. एस.पी. यांनी हे लक्षात घेतले पाहिजे, स्थानिक पोलीसांनी काळजी घेतली पाहिजे, पेट्रोलिंग झाले पाहिजे, पोलिसांनी जागरुक राहिले पाहिजे. गंगापुर रोडवरील झाडांच्या मुद्द्यावर बोलताना भुजबळ म्हणाले की, मी पालिका आयुक्तांसोबत बोललो. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले आहे. संबंधित कंपनीला ब्लॅकलीस्ट केले आहे. नागरिकांनीच आता रस्त्यावर आले पाहिजे. आता आपल्यालाच काम करावे लागेल, अशी प्रतिक्रिया भुजबळ यांनी दिली आहे.

कुंभमेळ्यासाठी लागणाऱ्या जागेविषयी बोलताना छगन भुजबळ म्हणाले, जर 38 हजार कोटी खर्च करणार आहेत. मागचे पैसे देणे आहे ते दिलेच पाहिजे. कोणावर अन्याय करता कामा नये. ही तयारी करतांना नाशिककरांच्या जिवावर उठणार नाही. नांदेडमधील दुष्काळाच्या मुद्द्यावर आयोजित बैठकीतील काजु बदामच्या मुद्द्यावर बोलताना छगन भुजबळ यांनी म्हटले की, कॅबिनेटमध्ये चर्चा झाली.



# संपादकीय

## मराठा आरक्षण प्रत्यक्ष कृतीच्या प्रतिक्षेत

महाराष्ट्रात बहुसंख्येने असलेल्या मराठा समाजाचा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावावा. आणि मराठा कुणबी आरक्षणाचा गुंता सोडवण्यासाठी मनोज जरांगे पाटील मुंबईकडे गणेशोत्सवात निघालेले होते. सरकारने तातडीने शिष्टमंडळ पाठवून पाटोदा (बीड) येथूनच त्यांचे आंदोलन तात्पुरते तीन महिन्यासाठी स्थगित करण्यात शिष्टमंडळातील सदस्य यशस्वी झाले . जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतले असले तरी मराठा समाजाच्या अपेक्षा संपलेल्या नाहीत. सरकारमध्ये आता केवळ आंदोलन शांत करण्याचे आव्हान नाही तर घटनात्मक चौकटीत कायदेशीर कसोट्यावर टिकणारे व समाजाला न्याय देणारे मार्ग शोधण्याची जबाबदारी वाढलेली आहे. लाखो आंदोलकांचा आक्रोश आणि सरकारच्या शिष्टमंडळाची प्रदीर्घ चर्चा.आणि उपोषण मागे घेण्याचा जरांगे पाटलांचा निर्णय या सर्व घटकांमुळे आता एकच प्रश्न सर्वसामान्य महाराष्ट्राच्या मनात घोंगावत आहे ९० दिवसाच्या मुदतीत सरकार आरक्षणाच्या प्रश्नावर तोडगा काढणार की पुन्हा एकदा मराठा समाजाला व जरांगे पाटील यांना आश्वासनाच्या भोवऱ्यात अडकवणार हा प्रश्न कायम अनुत्तरीत राहणार आहे. महाराष्ट्रातील मराठा समाजाचा प्रश्न गेल्या दशकभराहून अधिक वर्ष राज्याच्या सामाजिक आणि राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आहे.शिक्षणातील वाढता खर्च सरकारी नोकरीमधील मर्यादित संधी. शेती समोरील संकट. शेती उत्पादनाला हमीभावाची खात्री नाही. वारंवार पडणारा दुष्काळ. बेरोजगारी आणि अनंत आर्थिक अडचणी यामुळे ग्रामीण भागातील मराठा समाज भरडून गेलेला आहे. विशेषतः विदर्भ व मराठवाडा भागात त्याची तीव्रता जास्त असून या विभागात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण लक्षणीय आहे.त्यामुळेच या ठिकाणच्या मराठा समाजामध्ये अनेक वर्षापासून प्रचंड अस्वस्थता आहे. या अस्वस्थतेला संघटित स्वरूप देत मराठा क्रांती मोर्चा ने गेल्या काही वर्षात सलग ५८ हून अधिक मोर्चे मोठ्या प्रमाणावर काढलेले होते. सन २०१६ पासून सुरू झालेल्या या आंदोलनाच्या पुढील टप्प्यात मनोज जरांगे पाटील हे प्रमुख आंदोलनकर्ते म्हणून पुढे आले. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन इतर मागासवर्गीय अर्थात ओबीसी आरक्षणाचा लाभ मिळावा. ही त्यांच्या आंदोलनातील प्रमुख मागणी राहिलेली आहे.पात्र मराठा व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र मिळण्याच्या प्रक्रियेत काही प्रमाणात प्रगती झालेली आहे. परंतु संपूर्ण समाजाला आरक्षण मिळण्याच्या प्रश्नाला अजून म्हणावे इतके यश प्राप्त झालेले नाही. मराठा आरक्षणाचा प्रश्न सामाजिक न्याय. समान संधी. घटनात्मक तरतुदी आणि विविध मागासवर्गीय समाजाच्या हक्कांशी जोडला असल्याने या प्रश्नावर निर्णय घेताना सरकारला अनेक बाजूंचा सर्वकष दृष्टीकोन बाळगून विचार करावा लागणार आहे.जरांगे पाटील यांची भूमिका स्पष्ट आहे ते आंदोलनाचा दबाव कायम ठेवत सरकारला मागण्यांवर अपेक्षित सकारात्मक कृती करण्यासाठी वेळ द्यायचा मात्र हा वेळ अनिश्चित काळासाठी वाढू द्यायचा नाही. जरांगे पाटील यांच्या दृष्टीने केवळ आश्वासन पुरेसे नाही. प्रत्यक्ष कुणबी प्रमाणपत्रे वितरीत करण्यासाठी ठोस प्रशासकीय निर्णय आणि उर्वरित मागण्यावर कार्यवाही होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे उपोषण मागे घेणे तात्पुरते स्थगित करणे हा आंदोलनाचा शेवट नसून ती पुढील मोठ्या प्रदीर्घ आंदोलनाची तयारी आहे. व ते आंदोलन तीव्र स्वरूपाचे होण्याची दाट शक्यता आहे. जरांगे पाटील यांनी मराठा समाजाच्या मागणीसाठी आत्तापर्यंत दहाहून अधिक वेळा उपोषण केलेले आहे. परंतु सरकारने आत्तापर्यंत त्यांना आश्वासनच दिलेले आहे. प्रत्यक्ष मराठा समाजाच्या मागण्याबाबत सरकार सकारात्मक दिसत नाही असे निदर्शनास आलेले आहे. मंत्री समूहाशी केलेल्या चर्चेचा परिणाम होऊन व गणेशोत्सवात मुंबई पुण्यात येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून जरांगे पाटील यांनी दोन पावले मागे घेऊन व आझाद मैदानावर होणारे आंदोलन स्थगित करून मुंबईत जाण्याचा निर्णय मागे घेतलेला आहे. यापुढील कालावधीत जनतेचे लक्ष प्रत्यक्ष अंमलबजावणीकडे राहाणार आहे. मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवताना सर्वात मोठा अडथळा म्हणजे घटनात्मक आणि न्यायालयीन चौकट ही आहे. आरक्षण देण्याचा निर्णय घेताना सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणाचे निकष. उपलब्ध आकडेवारी. विद्यमान आरक्षणाची मर्यादा. आणि न्यायालयीन निर्णय याचा विचार करावा लागतो. मराठा आरक्षणाकरता सरकारने सर्व समावेशक भूमिका घेणे आवश्यक आहे. सर्वप्रथम पात्र मराठा व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण केली पाहिजे. सरकारने मराठा समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकासाठी शिक्षण रोजगार आणि उद्योगाच्या संधी वाढवण्यावर भर दिला पाहिजे. आरक्षण हा महत्त्वाचा विषय असला तरी रोजगार निर्मिती आणि आर्थिक सक्षमीकरण याशिवाय समाजातील अस्वस्थता पूर्णपणे कमी होणार नाही. शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य हमीभाव देणे.समाजाला न्याय देताना दुसऱ्या समाजाच्या हक्कावर गदा येणार नाही व अन्याय होणार नाही याची दक्षता घेणे ही सरकारची मोठी जबाबदारी आहे. त्याचवेळी आमदार आंदोलनकर्त्यांनी शांततामय आणि घटनात्मक मार्गाचा अवलंब करून आंदोलन करणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारे कायदा हातात घेऊन विध्वसंक घटना घडणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.मराठा आरक्षणाचा प्रश्न हा महाराष्ट्राच्या सामाजिक व्यवस्थेशी जोडलेला आहे. या प्रश्नांमध्ये केवळ आंदोलन व उपोषण म्हणून पाहणे चुकीचे ठरलेले आहे व ठरत आहे.तितकेच ते केवळ राजकीय आश्वासनाने व निवडणुकीतील मतदान मिळवण्यासाठी केलेल्या प्रचाराने सोडवता येईल असे मानून त्याकडे दुर्लक्ष करणे ही फार मोठी चूक आहे. तितकेच ते गंभीर पण आहे आरक्षणाचा निर्णय हा कोणत्याही समाजाच्या विरोधात नसून सामाजिक न्यायाच्या चौकटीत असला पाहिजे. मराठा समाजाच्या अपेक्षा. ओबीसी समाजाचे हक्क. आणि संविधानाची मर्यादा याचा समतोल राखणारा साधणारा मार्ग शोधणे हीच खरी सरकारची कसोटी आहे आता महाराष्ट्रात आश्वासनाची नव्हे तर प्रत्यक्ष कृतीची प्रतीक्षा आहे. मुदत संपल्यानंतर पुन्हा पुन्हा आंदोलनाची वेळ येऊ नये आणि त्या आंदोलनाला वेगळे स्वरूप येऊन बहुजन समाजात दुही. दुफळी. बेबनाव पसरवून कलह होऊ नये याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. यासाठी महाराष्ट्र सरकारने ठोस पावले उचलली पाहिजेत. कारण आरक्षणाचा हा प्रश्न केवळ एका समाजाचा नाही. तो महाराष्ट्राच्या सामाजिक विश्वासाचा व एकात्मतेचा मोठा प्रश्न आहे हे विसरून चालणार नाही.

## परिस्थिती माझी प्रेरणा : न्यायाधीश मंगेश धोत्रे



■ नारायणगाव (दै. संध्या)

हुतात्मा राजगुरू शिक्षण प्रसारक मंडळाचे सरसेनापती हंबीरराव मोहिते विधी महाविद्यालय, राजगुरुनगर येथे माजी विद्यार्थी आणि स्पर्धा परीक्षेतून पहिल्याच प्रयत्नात न्यायाधीश पदी निवड झालेले मंगेश आनंद धोत्रे यांनी "विधी विद्यार्थी ते न्यायाधीश" यशस्वी प्रवास या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी न्यायाधीश मंगेश धोत्रे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी भिती सोडून अभ्यास केला तर अशक्य काही नाही. परिस्थिती माझी प्रेरणा आहे त्यातून घडलो. तसेच न्यायाधीश पदासाठी एमपीएससी मार्फत घेण्यात येणाऱ्या प्री, मेन्स आणि मुलाखत या परीक्षेचे स्वरूप, प्रश्न, याविषयी सविस्तर माहिती देत अनुभव सांगितले. यावेळी प्राचार्य शिंदे म्हणाले की, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी न्यायाधीश झाले याचा आपल्या संस्था, महाविद्यालय, प्राध्यापक यांच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. इतर विद्यार्थ्यांनी आदर्श घेऊन अभ्यास करून यश संपादन करावे असे आवाहन करत शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार दिलीप अण्णा मोहिते पाटील, खजिनदार सुरेखाताई मोहिते पाटील, सचिव शिवाजीराव मोहिते पाटील, प्राचार्य डॉ.किरण शिंदे, परीक्षा विभागप्रमुख प्रा.किरण काळे, प्रा. संदीप तायडे, प्रा. प्राजक्ता घोलप, प्रा. सलोनी वाडेकर, प्रा.अभिजीत वैद्य, प्रा.विद्या पवार, प्रा. विनय राऊत, प्रा.ज्योती सांडभोर यांसह शिक्षकेतर कर्मचारी, विधी महाविद्यालयाचे एल.एल.बी व बी.ए.एल. एल.बी चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राचार्य किरण शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन उर्मिला डाकोरे यांनी तर आभार प्रा.किरण काळे यांनी मानले.

# अमितेश कुमार यांची येरवडा पोलीस ठाण्याला सदिच्छा भेट

### गणेशाची आरती करून नागरिकांशी साधला मनमोकळा संवाद; येरवडा पोलिसांच्या लोकाभिमुख कार्याचे कौतुक



■ पुणे (दै. संध्या)

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शनिवारी रात्री ११ वाजता येरवडा पोलीस ठाण्याला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी पोलीस ठाण्यातील श्री गणेशाची आरती करून उपस्थित नागरिकांशी मनमोकळा संवाद साधला. पोलीस आयुक्तांच्या या अनौपचारिक भेटीमुळे उपस्थित नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार येरवडा पोलीस ठाण्यात येणार असल्याची माहिती मिळताच परिसरातील नागरिक, स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी तसेच विघ्नहर्ता ट्रस्टचे समन्वयक मोठ्या संख्येने उपस्थित झाले. गणेशाची आरती झाल्यानंतर पोलीस आयुक्तांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधत परिसरातील विविध प्रश्न आणि नागरिकांच्या अपेक्षा जाणून घेतल्या.

यावेळी डीजेमुक्त दहीहंडी तसेच ईद-ए-मिलादचा सण शांततामय आणि सलोख्याच्या वातावरणात साजरा करण्यासाठी नागरिकांची सर्वसमावेशक सहमती मिळवून घेतल्याबद्दल येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते आणि त्यांच्या संपूर्ण पथकाचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी अभिनंदन केले. सण-उत्सवांच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांसोबत नागरिकांनीही सहकार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

दरम्यान, कल्याणीनगर परिसरात ध्वनी प्रदूषणाविरोधात जनजागृती तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या मोनिका शर्मा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी येरवडा पोलिसांच्या कार्याचे कौतुक करणारा हस्तलिखित शुभेच्छा संदेश तयार केला होता. हा संदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते आणि त्यांच्या सहकाऱ्यांना प्रदान करण्यात आला.

सामान्य नागरिकांमध्ये सहजपणे मिसळून त्यांच्या समस्या जाणून घेणे, त्यावर कायदेशीर आणि प्रभावी उपाययोजना करणे तसेच नागरिकांचा विश्वास संपादन करून लोकाभिमुख पद्धतीने काम करण्याच्या येरवडा पोलिसांच्या कार्यपद्धतीचे उपस्थित नागरिकांनी कौतुक केले.

'नागरिकांचा विश्वास, पोलिसांचा सेवाभाव आणि कायद्याचा सन्मान' या त्रिसूत्रीच्या माध्यमातून येरवडा पोलीस ठाण्याची लोकाभिमुख वाटचाल यापुढेही अशीच सुरू राहावी, अशा शुभेच्छांसह भेटीची सांगता झाली.

## शिक्षकांसाठी व्यावसायिक मानकांवर कार्यशाळा उत्साहात संपन्न




■ पुणे (दै. संध्या)

राष्ट्रीय व्यावसायिक मानकांविषयी शिक्षकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि बदलत्या शैक्षणिक वातावरणात त्यांची क्षमता वाढवणे या उद्देशाने, १० आणि ११ सप्टेंबर रोजी पुण्यातील महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या (एससीईआरटी) कॅम्पसमध्ये एका राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत महाराष्ट्रभरातील जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थांमधील (डीआयईटी) शिक्षक एकत्र आले होते.

कार्यशाळेत एससीईआरटी महाराष्ट्रच्या जॉइंट डायरेक्टर डॉ. कमलादेवी आवटे, एससीईआरटी महाराष्ट्रच्या डेप्युटी डायरेक्टर (प्री-सर्व्हिस डिपार्टमेंट) अरुणा यादव, एससीईआरटी महाराष्ट्रचे असिस्टंट डायरेक्टर (प्री-सर्विस डिपार्टमेंट) बालकृष्ण वाटरकर तथा स्टरलाइट एडइंडिया फाउंडेशनचे हेड डॉ. एंटनी नेलिसरी उपस्थित होते.

ही कार्यशाळा स्टरलाइट एडइंडिया फाउंडेशनच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आली होती, जी व्यावसायिक विकास, संस्थात्मक बळकटीकरण आणि डेटा-आधारित निर्णयप्रक्रियेद्वारे भारताची सार्वजनिक शिक्षण प्रणाली मजबूत करण्यासाठी कार्य करते. या कार्यक्रमाने सहभागींना एनपीएसटी (NPST) आराखडा आणि राष्ट्रीय मानके शिक्षक क्षमता, निरंतर व्यावसायिक विकास, मार्गदर्शन, मूल्यांकन आणि करिअरमधील प्रगती यांच्याशी कशी संबंधित आहेत हे समजून घेण्याची संधी दिली. या कार्यशाळेत सहभागींना एनपीएसटी (NPST) आराखड्याचा उद्देश, रचना आणि प्रमुख घटकांविषयी माहिती देण्यात आली. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) २०२० अंतर्गत शिक्षकांना त्यांच्या क्षमतांची समज सुधारण्यासाठी आणि व्यावसायिक विकासाची व्यापक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी व्यावसायिक मानके किती महत्त्वपूर्ण आहेत, यावर चर्चेत लक्ष केंद्रित करण्यात आले. कार्यशाळेचे संचालन करणाऱ्या डॉ. कमलादेवी आवटे म्हणाल्या, "राष्ट्रीय व्यावसायिक मानके शिक्षकांना अध्यापनाचा दर्जा आणि व्यावसायिकता सुधारण्यासाठी एक आवश्यक चौकट प्रदान करतात. यांसारख्या कार्यशाळा डीआयईटीच्या प्राध्यापकांना या मानकांबद्दल एक समान समज विकसित करण्याची आणि शिक्षक शिक्षण व व्यावसायिक विकासातील त्यांच्या महत्त्वावर चिंतन करण्याची संधी देतात. शैक्षणिक संस्थांमध्ये जागरूकता आणि ज्ञान वाढवणे हे व्यावसायिक मानकांशी अर्थपूर्ण संलग्नतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे." अरुणा यादव म्हणाल्या, "या कार्यशाळेने डीआयईटीच्या प्राध्यापकांना एनपीएसटीशी संलग्न होण्याची आणि व्यावसायिक विकास व मूल्यांकनातील त्याची क्षेत्रे, क्षमता आणि महत्त्व अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्याची संधी दिली."

## पारंपरिक कलांचा जागर

### गाडगे महाराज विद्यालयाची गणेश विसर्जन मिरवणूक दिमाखात



■ ओतूर (दै. संध्या)

गाडगे महाराज विद्यालयात गणेशोत्सवानिमित्त गणेश विसर्जन मिरवणूक मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांनी विविध पथकांच्या माध्यमातून पारंपरिक कला तसेच सामाजिक संदेशांचे प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले, अशी माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक संपत माने यांनी दिली.

मिरवणुकीमध्ये शोभा तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली झेंडा पथक, प्रकाश मोधे यांच्या मार्गदर्शनाखाली झांज पथक, सुनील खूपसे व अशोक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली लेझीम पथक, मनीषा ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मयूर पथक, संजय मेटकरी व सचिन मुखरे यांच्या मार्गदर्शनाखाली छत्री पथक तसेच रवींद्र अहिनवे व निवृत्त कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली टाळ पथक सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांनी ढोल-ताशा, झांज, लेझीम, टाळ व झेंडा पथकाच्या तालावर आकर्षक सादरीकरण करत मिरवणुकीत उत्साह निर्माण केला. यावेळी 'प्रदूषणमुक्त भारत' हा सामाजिक संदेश देणारा देखावा सादर करण्यात आला. प्रदीप कुमार मिरगे व तुषार पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली साकारलेल्या या देखाव्यात पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि प्रदूषणमुक्त जीवनशैलीचा संदेश देण्यात आला.

मिरवणुकीच्या नियोजनासाठी शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य नितीन पाटील व अरुण वाकचौरे तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक संपत माने, पर्यवेक्षक कैलास महाजन, सुनील पोकळे, धीरज कुमार सोनवणे, रामदास बगाड, दीपक पाटील, समाधान लवंगडे व सत्यवान भरणकर यांनी मोलाचे सहकार्य केले.

विद्यार्थी, शिक्षक व पालकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे गणेश विसर्जन मिरवणुकीत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. पारंपरिक कला, सांस्कृतिक मूल्यांची जपणूक आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत ही मिरवणूक उत्साहात संपन्न झाली.

# गणेशोत्सवाच्या देखाव्यातून 'हरित शहरा'चा संदेश; विजय मोराळेंचा अभिनव उपक्रम

### आधुनिक शहर नियोजनासोबत पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संगम; 'विकास करा, मात्र निसर्गाला सोबत घेऊन'चा संदेश

■ पुणे : (दै. संध्या)

ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेची कमतरता नाही. त्यांच्या कल्पनाशक्तीला योग्य दिशा देऊन त्यांच्या स्वप्नांना आकार देणे महत्त्वाचे आहे. ज्ञानदानाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये चांगले विचार, राष्ट्रप्रेम, जबाबदारीची जाणीव, संवेदनशीलता आणि समतावादी विचार रुजविण्याचे कार्य शिक्षकांनी करावे, असे प्रतिपादन आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान, पुरंदरचे अध्यक्ष विजयराव कोलते यांनी केले.

आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान, पुरंदर यांच्या वतीने शिक्षण क्षेत्रात प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरावर उल्लेखनीय आणि कार्यक्षम कामगिरी करणाऱ्या शिक्षकांचा विशेष पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

रविवार दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता प्रतिष्ठानच्या सासवड-पिसर्वे रोड येथील सभागृहात हा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. कै. अनुसयाबाई कृष्णाजी जगताप, कै. नारायण कृष्णाजी जगताप, कै. गुणाबाई नारायण जगताप आणि कै. सुमन हनुमंत जाधव, सासवड यांच्या स्मरणार्थ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात प्रा. डॉ. जगदीश दिनकर शेवते (मराठी विभाग प्रमुख, शंकरराव भेलके महाविद्यालय, नसरापूर), प्रशांत रमेश जगताप (न्यू इंग्लिश स्कूल, जेऊर), संदीप रामचंद्र



कुंभार (प्राथमिक शाळा, कोंडकेवाडी), सौ. मायादेवी विभीषण जाधव (प्राथमिक शाळा, सिदोबाची वाडी) आणि सौ. संगीता प्रमोद म्हेत्रे (सावित्रीबाई फुले शाळा क्र. २, नगरपालिका सासवड) यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास म.सा.प सासवड शाखेचे अध्यक्ष ॲड. दिलीप निरगुडे, विश्वस्त आण्णासाहेब खाडे, प्रतिष्ठानचे सहसचिव बंडुकाका जगताप, गौरव कोलते, अशफाक बागवान,प्राचार्य संदीप टिळेकर, सौ. शशिकला कोलते, विलास जगताप, सुनील लोणकर, हेमंत ताकवले, विद्या जाधव यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानचे सचिव शांताराम पोमण यांनी केले.

त्यांनी प्रतिष्ठानच्या विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेत शिक्षकांच्या समाजातील योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### 'आवर्तन' कथक नृत्याविष्काराने जिंकली उपस्थितांची मने

**पुणे : दैनिक संध्या**

वय वर्ष सहा ते पन्नास वयोगटातील नृत्यांगना...चेहऱ्यावरील नेमक्या भावमुद्रा... विविध ताल, तराणे, रचना, बंदिशी...आणि त्यावर एकसारखी थिरकणारी घुंगरांची पावले...अशा सुंदर नृत्याविष्काराने सोमवारची संध्याकाळ रंगली होती. निमित्त होते 'लयोम इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट्स अँड मीडिया'च्या 'आवर्तन २०२६'कार्यक्रमाचे. संस्थेचा १६ वा वर्धापनदिन आणि गणेशोत्सवानिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कोथरुड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात साजऱ्या झालेल्या या कार्यक्रमातील सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. यावेळी प्रसिद्ध नृत्यांगना राधिका साठे यांनी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थिती लावली. लयोमच्या संस्थापिका वेदांती भागवत महाडिक यांच्यासह त्यांच्या शिष्यांनी वैविध्यपूर्ण नृत्यरचना सादर करीत उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. कार्यक्रमाची सुरुवात १२० नृत्यांगनांच्या हातातील दिव्यांसोबत नमामि शमिशान या रुद्राष्टकमने झाली. यानंतर गणेश स्तुती, ताल तीनतालाचे सादरीकरण, विठ्ठलावरील 'देह विठ्ठल विठ्ठल झाला हे' भक्तीगीत, वेदांती यांनी सादर केलेले शिवगौरी नृत्य, ताल धमार, बंदिशीवरील फ्यूजन अशी एकाहून एक उत्तम सादरीकरण करत विद्यार्थिनींनी उपस्थितांची मने जिंकली. तसेच प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांच्या गायनातील अमूल्य अशा योगदानाबद्दल आदरांजली वाहण्यात आली. त्यांनी गायिलेल्या 'निगाहे मिलाने को जी चाहता है...' आणि 'झुमका गिरा रे' या गीतांवर विद्यार्थिनींनी उत्तम सादरीकरण केले. अभिनय आणि तालाची सुरेख सांगड घातलेल्या रुक्मिणी स्वयंवरने कार्यक्रमाची सांगता झाली. राधिका साठे यांनी यावेळी मनोगत व्यक्त करताना वेदांती आणि त्यांच्या विद्यार्थिनींचे विशेष कौतुक केले. पं राजेंद्र गंगाणी हे वेदांती आणि आपले गुरू असल्याने आपण गुरूभगिनी असल्याचाही उल्लेख त्यांनी यावेळी आवर्जून केला. आजच्या काळात कलेचे अधिष्ठान असणे ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. कला कोणत्याही वयातील व्यक्तीला निश्चितच आनंद देते. कला शिकणारी प्रत्येक विद्यार्थिनी त्यात पुढे खूप मोठे काही करेलच असे नाही. पण ती कला शिकत असताना कलेचा, जगण्याचा, शिस्तीचा संस्कार देणे हे गुरू म्हणून आमचे काम असल्याचे त्या म्हणाल्या.



### औषध सुरक्षा कायदा, रुग्णालयीन बिलांचे ऑडिट करा

**पुणे : दैनिक संध्या**

औषधांच्या किमतीतील पारदर्शकता, रुग्णालयीन बिलांचे शासकीय लेखापरीक्षण आणि रुग्णांच्या आर्थिक हक्कांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारावी, अशी मागणी रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत केली. तीन महिन्यांच्या मुदतीत औषध सुरक्षा कायदा लागू झाला नाही, तर तीव्र स्वरूपाचे राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला. यावेळी रुग्ण हक्क परिषदेचे केंद्रीय सचिव डॉ. स्वानंद पंडित, पुणे शहर अध्यक्ष अपर्णा मारणे-साठ्ये, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अशोक शिंदे आदी उपस्थित होते. उमेश चव्हाण म्हणाले, "रुग्णालयातील वाढता उपचार खर्च, महागडी औषधे तसेच विविध शुल्कांमुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवत आहे. अनेकदा रुग्णालयांकडून आपल्याच रुग्णालयातील फार्मसीमधून औषधे खरेदी करण्याची सक्ती केली जाते. या औषधांची किंमत खूप जास्त असल्याने रुग्णाच्या नातेवाईकांवर आर्थिक ताण येतो. त्यामुळे जीवनावश्यक व जीवनरक्षक औषधांची उपलब्धता आणि किमतीतील पारदर्शकतेसाठी स्वतंत्र 'औषध सुरक्षा कायदा' करावा, अशी मागणी परिषदेतर्फे आम्ही करत आहोत. हा कायदा फौजदारी संहितेचा असावा आणि संबंधितांना त्याअंतर्गत दंड, कठोर शिक्षा आणि वेळप्रसंगी अटक व्हायला हवी. औषधांची खरेदी किंमत, छापील कमाल किरकोळ किंमत (एमआरपी) आणि अंतिम विक्री किंमत याबाबत पारदर्शकता वाढवावी, असेही त्यांनी नमूद केले. याबरोबरच जनरल वॉर्डसह आयसीयू, विशेष कक्ष आणि अन्य विभागांतील रुग्णालयीन बिलांचे नियमित शासकीय ऑडिट करावे. यामध्ये नियमबाह्य आकारणी आढळल्यास संबंधित रुग्णाला अतिरिक्त रक्कम परत करण्याची व्यवस्था करावी. प्रत्येक रुग्णाला औषधे, तपासण्या, प्रक्रिया, बेड व डॉक्टरांच्या शुल्कासह तपशीलवार बिल देणे बंधनकारक करावे. तसेच धर्मादाय रुग्णालयांचे नियमित सोशल ऑडिट करून मोफत व सवलतीच्या खाटांची माहिती सार्वजनिक करावी, अशी मागणीही करण्यात आली. शासनाने येत्या ३० दिवसांत य़ाबाबतचा ठोस कृती आराखडा जाहीर करावा, अन्यथा राज्यभर आंदोलन करण्याचा इशारा चव्हाण यांनी दिला.

### म्हाडाच्या ४ हजार ४६२ सदनिकांची सोडत आता २६ नोव्हेंबरला

**पुणे : दैनिक संध्या**

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या (म्हाडा) ४ हजार ४६२ सदनिकांच्या सोडतीची तारीख पुढे ढकलण्यात आली आहे. त्यानुसार आता २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता सोडत काढण्यात येणार आहे. ऑनलाइन अर्ज सादर करण्यासाठी १५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ दिल्याने सोडतीचे संपूर्ण वेळापत्रकही बदलण्यात आले आहे. विजेत्या अर्जदारांची नावे त्याच दिवशी सायंकाळी ६ वाजता संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहेत. पुणे मंडळातर्फे १५ टक्के सामाजिक गृहनिर्माण आणि २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनांतील सदनिकांच्या वितरणासाठी २४ ऑगस्ट रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार ऑनलाइन अर्जासाठी सुरुवातीला १५ सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र, अनेक अर्जदारांना कागदपत्रांच्या ऑनलाइन पडताळणी मध्ये अडचणी येत असल्याने अर्जाची मुदत एका महिन्याने वाढवून १५ ऑक्टोबर करण्यात आली आहे.

# व्हीआर तंत्रज्ञानाद्वारे 'दगडूशेठ'च्या आरतीचा अनुभव

**खडकीच्या पीआरसीमधील सुमारे ४५ सैनिकांनी आणि सूर्य सह्याद्री रुग्णालयातील रुग्णांनी व्हर्च्युअल रिॲलिटीच्या माध्यमातून घेतला गणेश आरतीचा अनुभव**

■ पुणे (दै. संध्या)

गणेशोत्सव हा बाप्पाचे आशीर्वाद घेण्यासाठी एकत्र येवून आरती करण्याचा उत्सव आहे. परंतु, प्रत्यक्ष उपस्थित राहता न येणाऱ्या व्यक्तींनाही या अनुभवापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी व्हीआर तंत्रज्ञानाद्वारे दिव्यांग सैनिक आणि रुग्णांनी 'दगडूशेठ'च्या आरतीचा अनुभव घेतला. खडकीच्या पीआरसीमधील सुमारे ४५ सैनिकांनी आणि सूर्य सह्याद्री रुग्णालयातील रुग्णांनी व्हर्च्युअल रिॲलिटीच्या माध्यमातून गणेश आरती केली.

खडकी येथील पॅराप्लेजिक रिहॅबिलिटेशन सेंटर (पीआरसी) मध्ये उपचार व पुनर्वसन घेत असलेल्या सुमारे ४५ सैनिकांना तसेच शनिवारवाड्याजवळील सूर्य सह्याद्री रुग्णालयातील रुग्णांना श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीच्या आरतीचा व्हर्च्युअल रिॲलिटी (व्हीआर) तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अनुभव घेता आला. प्रत्यक्ष मंदिरात उपस्थित राहता येत नसतानाही बाप्पासमोर उभे असल्याचा अनुभव या तंत्रज्ञानामुळे मिळाला. यावेळी सेंटरचे वैद्यकीय संचालक कर्नल डॉ. आर. के. मुखर्जी व क्यूबिटच्या शाल्वी पारगे उपस्थित होते. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या सहकार्याने पुणेस्थित तंत्रज्ञान कंपनी क्यूबिटने हा उपक्रम राबविला.सैनिक आणि रुग्णांना व्हीआर हेडसेटच्या माध्यमातून ३६० अंशांच्या स्वरूपात आरतीचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. या अनुभवात सहभागी झालेल्या सैनिकांनी आनंद व्यक्त केला. प्रत्यक्ष मंदिरात जाता येत नसले तरी व्हीआर तंत्रज्ञानामुळे आपण बाप्पासमोरच उपस्थित असल्याची भावना निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले.

पीआरसीमधील सैनिकांचा या उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद अत्यंत उत्साहवर्धक होता. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भावनिक आणि आध्यात्मिक नाते निर्माण करून आरतीचा अनुभव अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवता येणे, ही आमच्यासाठी समाधानाची बाब आहे," असे क्यूबिटच्या शाल्वी पारगे यांनी सांगितले. क्यूबिट गेल्या १० वर्षांपासून श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीच्या आरतीचा व्हीआर अनुभव तयार करीत आहे. यंदा या उपक्रमाचे अकरावे वर्ष आहे. गणेशोत्सवाच्या पहिल्या दिवशी होणाऱ्या आरतीचे विशेष ३६० अंशांमध्ये चित्रीकरण करणाऱ्या अत्याधुनिक कॅमेऱ्यांचा यासाठी वापर केला जातो. त्यानंतर हे चित्रीकरण व्हीआर ॲप्लिकेशनमध्ये रूपांतरित करण्यात येते. त्यामुळे गणेशोत्सवाच्या काळात प्रत्यक्ष मंदिरात जाता न येणाऱ्या व्यक्तींनाही आरतीचा अनुभव घेता येतो. यापूर्वी या उपक्रमाच्या माध्यमातून रुग्णालयात उपचार घेत असलेले रुग्ण, ज्येष्ठ नागरिक तसेच दिव्यांग व्यक्ती अशा विविध घटकांना दगडूशेठ गणपतीच्या आरतीचा आभासी अनुभव देण्यात आला आहे.





### 'दगडूशेठ' गणपतीच्या दर्शनाला भाविकांची अलोट गर्दी

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळाच्या १३४ व्या गणेशोत्सवानिमित्त साकारण्यात आलेल्या वृंदावन येथील प्रेम मंदिराची भव्य प्रतिकृती पाहण्यासोबतच लाडक्या गणरायाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची झालेली अलोट गर्दी.

## २० बाय २० फुटांच्या रांगोळीतून पंतप्रधान नरेंद्र मोदींना शुभेच्छा

■ पुणे (दै. संध्या)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त रविवार पेठेतील संत नामदेव चौकात २० फूट बाय २० फूट आकाराची भव्य रांगोळी काढून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. लोककल्याण प्रतिष्ठान, प्रल्हाद गवळी मित्र परिवार आणि भाजप पुणे शहर यांच्या वतीने आयोजित या उपक्रमात ७६ दिवे पेटवून आणि ७६ किलो पेढ्यांचे वाटप करून वाढदिवसाचा आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

रविवार पेठेतील संत नामदेव चौकात काढण्यात आलेल्या भव्य रांगोळीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. रांगोळीच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. या उपक्रमामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. नागरिकांनी रांगोळीचे कौतुक करत उपक्रमाला प्रतिसाद दिला. ही रांगोळी पाच दिवस पुणेकरांना पाहता येणार आहे. या उपक्रमास नगरसेवक राजेंद्र काकडे, भाजप राष्ट्रीय लीगल सेल कमिटीचे सदस्य ॲड. हिरसिंग राजपुरोहित, मंडल अध्यक्ष छगन बुलाखे, सरचिटणीस माधव साळुंके, अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष सुनील खंडागळे, उपाध्यक्ष प्रशांत बढाई, अजय बढाई, विलास सिन्नरकर, साईनाथ चकोर, प्रशांत बल्ला, आदेश अवघडे, सोनाली थोपटे, विकास गवळी, विक्रम लगड आदी उपस्थित होते.

"वाढदिवसाच्या निमित्ताने २० फूट बाय २० फूट आकाराची रांगोळी काढून आनंदोत्सव साजरा केला. ७६ दिवे पेटवून आणि ७६ किलो पेढे वाटून नागरिकांसोबत हा आनंद द्विगुणित झाला. वाढदिवस केवळ औपचारिक न ठेवता सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमातून साजरा करण्याचा आमचा प्रयत्न आहे. नागरिकांचे प्रेम, सहकार्य आणि उत्स्फूर्त सहभाग यामुळे हा उपक्रम संस्मरणीय ठरला," अशी भावना आयोजक प्रल्हाद गवळी यांनी व्यक्त केली. 'मूर्ती तुमची, किंमत तुमची' या उपक्रमांतर्गत नुकतेच पाच हजार गणपती मूर्तींचे वाटप करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.



### पुणे विद्यापीठाच्या परीक्षा केंद्रांचे लेखापरीक्षण

पुणे: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील आगामी परीक्षा अधिक पारदर्शक आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडाव्यात, यासाठी विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयांच्या परीक्षा केंद्रांचे लेखापरीक्षण करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. राजेंद्र तलवारे यांनी दिली आहे.

# 'दगडूशेठ': उत्सवमंडपात श्री मोरया गोसावी पालखी सोहळ्याचे स्वागत

■ पुणे (दै. संध्या)

श्री मोरया गोसावी यांनी भाद्रपद महिन्यातील मोरगावला सुरु केलली पालखी परंपरा परतीच्या वेळी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती उत्सव मंडपात दरवर्षी येते. यावर्षी देखील पायी पालखी सोहळा करुन उत्सव मंडपात आलेल्या पालखीचे स्वागत व आरती श्रीमंत दगडूशेठ गणपती ट्रस्टच्या विश्वस्त व पदाधिका-यांच्या हस्ते करण्यात आली. तसेच चिंचवड देवस्थानच्या विश्वस्तांनी श्री दगडूशेठ गणपतीची देखील आरती केली.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळा तर्फे उत्सवाच्या १३४ व्या वर्षी चिंचवड देवस्थान ट्रस्ट तर्फे आलेल्या पालखीचे स्वागत करण्यात आले. यावेळी चिंचवड देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव, दगडूशेठ गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सहचिटणीस अमोल केदारी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे सौरभ रायकर, मंगेश सूर्यवंशी, विनायक रासने, सचिन आखाडे यांसह विश्वस्त, पदाधिकारी व कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

श्री मोरया गोसावी विनायकी चतुर्थी ला मोरगावला जात असत. एकदा विनायकी चतुर्थीला गेले असताना मयुरेश्वराने त्यांना दृष्टांत दिला की आता तू वृद्ध झाला आहेस, तुझे कष्ट पाहवत नाहीत. त्यामुळे मीच तुझ्या घरी येईन. त्या दृष्टांताप्रमाणे चिंचवडमधील गणेश कुंडामध्ये क-हा नदीच्या तीरी



मयूरेश्वराची मूर्ती सापडेल, असे सांगितले. त्याप्रमाणे प्रति मयुरेश्वर रुपाची मूर्ती सापडली. श्री मोरया गोसावी यांनी ती मूर्ती चिंचवडमधील मंगलमूर्ती वाडयात स्थापन केली.तेव्हापासून दर माघ व भाद्रपद महिन्यात श्री मंगलमूर्ती (प्रति मयुरेश्वर) पालखीतून मोरगावला श्री मयुरेश्वराच्या भेटीला जाते. ही पालखी चिंचवड ते मोरगाव अशी माघ महिन्यात रथातून आणि भाद्रपद महिन्यात युवा कार्यकर्ते खांद्यावर पालखी घेऊन जातात. या दोन्ही वेळेला मोरगावला दिवाळीसारखे वातावरण असते. दर तृतीयेला पालखी मोरगावला पोहोचते. तेथे चतुर्थीला पूजा, आवर्तने, छबिना, पंचमीला अन्नदान असे कार्यक्रम झाल्यावर षष्टीला पालखी परतीच्या प्रवासाला निघते. त्यानंतर पुण्यात श्री दगडूशेठ गणपती मांडवात आल्यावर दगडूशेठ गणपती ट्रस्टचे विश्वस्त व व्यवस्थापनामार्फत पालखीचे स्वागत व आरती केली जाते. तर चिंचवड देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव हे श्री दगडूशेठ गणपतीची आरती करतात. हा सोहळा अनुभविण्यासारखा असतो. मोरगावला जाताना श्री कसबा गणपतीला देखील पालखीचे स्वागत होते आणि परतीच्या प्रवासात शेवटी 'दगडूशेठ' गणपतीला पालखी येते.

दैनिक संध्या
सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६



## थोडक्यात पण महत्वाचे



## जुन्नरमध्ये रंगणार श्री तुळजाभवानी माता पलंगाचा भव्य आगमन सोहळा

**नारायणगाव : दैनिक संध्या**

जुन्नर शहरामध्ये शनिवार, १९ सप्टेंबर रोजी श्री तुळजाभवानी माता पलंगाचे अत्यंत उत्साहात आगमन होत आहे. या आगमनानिमित्त शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून, त्यानंतर रविवार तिळवण तेली समाज कार्यालयामध्ये पारंपारिक धार्मिक विधी आणि विधीवत पूजा करून या पवित्र पलंगाची स्थापना केली जाणार आहे. या ऐतिहासिक सोहळ्यानिमित्त जुन्नरमध्ये १९ ते २८ सप्टेंबर या कालावधीत विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे जय्यत आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, २६ सप्टेंबर रोजी सकाळी होम हवन आणि संध्याकाळी महाआरती होईल. त्यानंतर सर्व भाविकांसाठी भंडारा महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच रविवार, २७ सप्टेंबर रोजी सकाळी आरती झाल्यानंतर जुन्नर शहरातून पलंगाची भव्य मिरवणूक काढली जाईल आणि हा पलंग तुळजापूरकडे प्रस्थान करेल. श्री तुळजाभवानी मातेचा हा पलंग तयार करण्याची परंपरा शेकडो वर्षांची आहे. आंबेगाव तालुक्यातील घोडेगाव येथील ठाकूर कुटुंब हा पलंग तयार करते. त्यानंतर जुन्नर येथील तिळवण तेली समाज बांधवांतर्फे या पलंगाची विधिवत पूजा,स्वागत करून पुढील सोहळ्याचे व्यवस्थापन केले जाते. या पलंगाकरिता भवानी मातेकरीता गादी, पासोडा याचा मान हा तिळवण तेली समाजाचा आहे. हा पलंग तिळवण तेली सभागृहात वास्तव्यात असतो. हा पलंग पुढे पायी प्रवासाने तुळजापूरकडे मार्गस्थ होतो आणि दसऱ्याच्या आदल्या दिवशी तुळजापूरला पोहोचतो. विजयादशमीला देवी सीमोल्लंघन करून याच पलंगावर निद्रा घेते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यानंतर कोजागिरी पौर्णिमेला देवी पुन्हा सिंहासनावर विराजमान होते आणि जुना पलंग होमामध्ये अर्पण केला जातो. या सर्व धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांमध्ये जुन्नर परिसरातील जास्तीत जास्त भाविकांनी व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन तेली समाजाचे अध्यक्ष कैलास गरीबे तसेच गोकुळ भागवत, दत्तात्रय कर्डिले, अविनाश कर्डिले, महेश घोडेकर, संजय कर्पे, प्रशांत फल्ले व जुन्नर तिळवण तेली समाज बांधवांनी केले आहे.

## UPI-द्वारे ₹2,000 पेक्षा अधिक किमतीच्या इंधन खरेदीवर केवळ ₹5 इतका सवलतीचा MDR

**पुणे : दैनिक संध्या**

पेट्रोल पंप चालकांना कमी आणि निश्चित खर्चात UPI पेमेंट स्वीकारता यावे, यासाठी इंधन खरेदीसाठी विशेष सवलतीची MDR रचना लागू करण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड आणि वॉलेटसारख्या इतर पेमेंट माध्यमांवर लागू होणाऱ्या शुल्काच्या तुलनेत हे शुल्क लक्षणीयरीत्या कमी आहे. ग्राहकांनी काय जाणून घ्यावे UPIद्वारे पेमेंट करणे ग्राहकांसाठी यापुढेही मोफत राहणार आहे. ग्राहकांना त्यांनी खरेदी केलेल्या इंधनाचीच किंमत अदा करावी लागेल. पेट्रोल पंप चालकांनी काय जाणून घ्यावे ₹2,000 पर्यंतच्या इंधन पेमेंटवर MDR नाही ग्राहकाने UPIद्वारे ₹2,000 पर्यंतचे पेमेंट केल्यास MDR शून्य असेल आणि या व्यवहारांवर पेट्रोल पंप चालकांना कोणतेही शुल्क द्यावे लागणार नाही. ₹2,000 पेक्षा अधिक इंधन पेमेंटवर केवळ ₹5 MDR ₹2,000 पेक्षा अधिक किमतीच्या इंधन पेमेंटसाठी पेट्रोल पंप चालकांना प्रति व्यवहार ₹5 इतका निश्चित MDR द्यावा लागेल. बिलाची रक्कम कितीही मोठी असली तरी हे शुल्क समान राहील. इंधनाचे बिल ₹2,500, ₹5,000 किंवा ₹10,000 असले, तरी MDR केवळ ₹5 इतकाच राहील. क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड आणि वॉलेटवर सामान्यतः आकारल्या जाणाऱ्या शुल्काच्या तुलनेत हा खर्च कमी आहे.

## श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचा दुहेरी गौरव

**आळंदी : दैनिक संध्या**

पुणे जिल्हा शिक्षक लोकशाही आघाडी, पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघ, पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षिका संघ, सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षक संघ आणि पुणे जिल्हा उच्च माध्यमिक शिक्षक संघाच्या कार्यकारिणीच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार सोहळ्यात श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचा दुहेरी गौरव झाला आहे. श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, आळंदी देवाची यांना 'आदर्श शिक्षण संस्था' पुरस्कार जाहीर झाला असून, विद्यालयातील उपशिक्षक वालकोळी सर यांची 'जिल्हास्तरीय गुणवंत आदर्श शिक्षक' पुरस्कारासाठी निवड झाली आहे. या पुरस्कारांचे वितरण राज्याच्या मंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे.

फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद फुरसुंगी,
ता. हवेली, जि. पुणे-४१२३०८
ई-मेल: fursungi.urulidevachinp2024@gmail.com

जा.क्र.फु.ऊ.दे.न.पा/१७३७/२६-२७ दिनांक: १७/०१/२०२६

**जाहीर निविदा सूचना**

फुरसुंगी उरुळी देवाची नगरपरिषद खाली नमूद कामाच्या जाहीर निविदा मागवीत आहे. कामाचा सविस्तर तपशील असलेल्या व निविदा अटी शर्ती असलेले कोरे फॉर्म नगर परिषदेत महिला व बालकल्याण विभागात दि.२१/०९/२०२६ ते २८/०९/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळतील. निविदेसोबत इसारा रक्कम रोखीने भरल्याची पावती/पावतीची झेरॉक्स जोडावी. निविदाधारकांनी सीलबंद निविदा म. मुख्याधिकारी फुरसुंगी उरुळी देवाची नगरपरिषद यांचे दि-२८/०९/२०२६ रोजी दुपारी ३.३० वा पर्यंत नगरपरिषदेच्या आवक विभागात सादर कराव्यात निविदा शक्यतो त्याच दिवशी मुख्याधिकारी यांचे दालनात उघडण्यात येतील. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा हक्क नगरपरिषदेस राहील त्याबाबत कोणतीही कारणे दिली जाणार नाही.

| अ.क्र. | कामांचे नांव | निविदा फॉर्म फी | कामाची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | फुरसुंगी उरुळी नगरपरिषद फुरसुंगी उरुळी देवाची नगरपरिषद हद्दीतील महिलांसाठी योगा, प्राणायम, कराटे व मर्दानी खेळ प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे. | ५००/- | २५००/- |

शिक्का

सही/-
(प्रसाद शिंगटे) मुख्याधिकारी
फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद



शनिवारी ज्येष्ठ गौरीचे विसर्जन झाल्यानंतर गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी दिसून आली. परिवारासह सर्व जण बाप्पाच्या दर्शनासाठी बाहेर पडलेले दिसून आले. (Exclusive Pictures by : Sushil Rathod)




## १६ वर्षांत १६ सामाजिक उपक्रमांची परंपरा

साईनाथ मंडळ ट्रस्ट, बुधवार पेठ. शेलार खिंड ----- रणरागिणींच्या शौर्याला मानाचा मुजरा : स्वराज्याच्या लढ्यात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून, प्रसंगी प्राणांची बाजी लावणाऱ्या रणरागिणींच्या अतुलनीय शौर्याला समर्पित असा भव्य-दिव्य ऐतिहासिक देखावा — शेलार खिंड. इतिहासाच्या पानांमध्ये अनेकदा दुर्लक्षित राहिलेल्या वीरांगनांच्या पराक्रमाची आणि स्वराज्याच्या लढ्यातील स्त्रियांच्या मोलाच्या योगदानाची जाणीव करून देणारा हा देखावा प्रेक्षकांना थेट इतिहासाच्या रणभूमीवर घेऊन जातो. देखाव्यात एकूण १६ कलाकार आपल्या जिवंत अभिनयातून इतिहासातील थरारक प्रसंग साकारत आहेत.

विशेष आकर्षण म्हणजे एका बुरुजावरून दुसऱ्या बुरुजावर जाणारा रोमांचकारी प्रसंग! हा प्रसंग पाहताना प्रेक्षकांच्या अंगावर अक्षरशः शहारे येतात. इतिहास केवळ वाचायचा नसतो, तो अनुभवायचा असतो... जगायचा असतो... आणि पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवायचा असतो! शेलार खिंड हा केवळ एक देखावा नाही, तर स्वराज्यासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या रणरागिणींना केलेला मानाचा मुजरा आहे.



किंजल वैश्य हीच्या कल्पनेतून साकारलेल्या तीन पिल्लांच्या मध्ये टायगर मध्ये वसलेली गणरायाची मूर्ती.साऊथ इंडियन केरला येथे डोंगरावर वसलेल्या अय्यप्पा मंदिरात वर्षातून एकदा शबरीमाला यात्रा भरते.हा परिसर जंगल टायगर म्हणून ओळखला जातो.परंतू यात्रेच्या वेळी टायगर कधी बाहेर येत नाहीत.अशी अनेक वर्षांची परंपरा आहे.डेकोरेटर संजय वैश्य यांच्या घरी विराजमान झालेल्या गणरायाची मूर्ती नायगाव येथील मुर्तीकार रोहित राणे यांनी मातीची बनवली आहे.सदर देखावा बघण्यासाठी विक्रोळीकर वैश्य यांच्या घरी भेट देत आहेत.

## शासकीय तालुकास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत ज्ञानसागरच्या खेळाडूंचे वर्चस्व

■ **सावळ : (दै. संध्या)**

बारामती येथे नुकत्याच पार पडलेल्या शासकीय तालुकास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत ज्ञानसागर इंग्लिश मिडियम स्कूलच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले.विविध वयोगट व वजनगटांमध्ये ज्ञानसागरच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य, आत्मविश्वास आणि जिद्दीचे दर्शन घडवत शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली.

या स्पर्धेत ज्ञानसागरच्या पाच खेळाडूंनी प्रथम क्रमांक,तर तीन खेळाडूंनी द्वितीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. सोहेल मुस्ताक खान (१७ वर्षे, ४८ ते ५१ किलो गट) , सार्थक सुदर्शन ताकमोगे ( १७ वर्षे, ५१ ते ५५ किलो गट) ऋग्वेद रोशन वराडे (१९ वर्षे, ४५ ते ४८ किलो गट), कृष्णा कैलास सूर्यवंशी (१९ वर्षे, ४१ ते ४५ किलो गट), सुकृत दिलीप तुपे (१७ वर्षे, ७३ ते ७६ किलो गट) यांनी प्रथम क्रमांक पटकाविला तर यशराज तुकाराम धवडे -(१४ वर्षे, २७ ते २९ किलो गट), कृष्णा सुनील गायकवाड ( १७ वर्षे, ३५ किलो गट), श्रेयश बापुराव ठोंबरे (१९ वर्षे, ४५ ते ४८ किलो गट) यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. या सर्व खेळाडूंनी स्पर्धेत दाखविलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले. खेळाडूंच्या या यशामागे त्यांचे सातत्यपूर्ण सराव, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि शाळेने उपलब्ध करून दिलेल्या क्रीडा सुविधांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.सागर आटोळे सर यांनी सर्व यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. ज्ञानसागर इंग्लिश मिडियम स्कूलच्या खेळाडूंनी मिळविलेल्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून,त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.






नवसाचा गणपती हुतात्मा बाबू गेनू मंडळ ट्रस्ट पुणे अध्यक्ष. बाळासाहेब मारणे-छाया सुनिल ठाकूर.

# उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या प्रमुख गणेश मंडळांना भेटी

## महापालिकेच्या तयारीची मंडळ पदाधिकाऱ्यांना माहिती; मेट्रो, पोलिस आणि पालिका प्रशासनाला आवश्यक नियोजनाच्या सूचना



■ **पुणे (दै. संध्या)**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी शहरातील प्रमुख गणेश मंडळांना भेटी देऊन उत्सवाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या व्यवस्थेचा आणि सुविधांचा आढावा घेतला. त्यांनी मानाचा पाचवा गणपती केसरीवाडा, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी मंडळ, अखिल मंडई मंडळ आणि साने गुरुजी मंडळांना भेट देत मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. गणेशोत्सवासाठी पुण्यात राज्याच्या विविध भागांसह देशभरातून मोठ्या संख्येने भाविक दाखल होतात. भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन महापालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या सुविधा व उपाययोजनांची माहिती वाडेकर यांनी घेतली. भाविकांची सुरक्षितता, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता, पिण्याचे पाणी आणि इतर नागरी सुविधांबाबत प्रशासनाच्या नियोजनाचाही त्यांनी आढावा घेतला. गणेशोत्सव काळात पुणे शहरातील प्रमुख गणेश मंडळांना भेट देणाऱ्या भाविकांसाठी मेट्रो सेवा महत्त्वाची ठरत असल्याचे वाडेकर यांनी सांगितले. मेट्रोमुळे मोठ्या संख्येने नागरिक शहराच्या मध्यवर्ती भागात पोहोचत असल्याने वाहतूक कोंडी कमी करण्यास तसेच भाविकांना सुलभ प्रवासाची सुविधा मिळण्यास मदत होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### स्वर्गीय तात्या बापट स्मृती समितीच्या 'भारत माता भवन'च्या वास्तुवृद्धीचा शुभारंभ

**पिंपरी : दैनिक संध्या**

चिंचवड येथील स्वर्गीय तात्या बापट स्मृती समिती संचलित 'भारत माता भवन'च्या वास्तुवृद्धीचा (इमारतीवर दोन नवीन मजले) बांधण्याच्या कामाचा शुभारंभ खासदार श्रीरंग बारणे यांच्या शुभहस्ते रविवारी पार पडला. या वास्तूच्या विस्तारासाठी बारणे यांनी खासदार निधीतून ५० लाख रुपयांचा निधी दिला असून, आवश्यकतेनुसार अतिरिक्त निधी देण्याची ग्वाही देखील खासदार बारणे यांनी या प्रसंगी दिली. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाहक मुकुंदराव कुलकर्णी, प्रांत संपर्क प्रमुख मिलिंदराव देशपांडे, पिंपरी-चिंचवड शहर संघचालक विनोद बन्सल, संघ अधिकारी विनायकराव थोरात, महापालिकेच्या 'ब' प्रभागाचे अध्यक्ष मंदार देशपांडे, प्रकल्प आर्किटेक्ट उदय कुलकर्णी, जयदीप खापरे, रवी नामदे, उदय हळदीकर उपस्थित होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रेरणेने कार्यरत असलेल्या तात्या बापट स्मृती केंद्राचे कार्य अत्यंत उल्लेखनीय असल्याचे सांगत खासदार बारणे म्हणाले, 'पूर्वांचल राज्यातील विद्यार्थ्यांना येथे आणून त्यांच्यावर उत्तम संस्कार केले जातात. भारतीय संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याचे मोठे कार्य या माध्यमातून होत आहे. देशाची अखंडता आणि राष्ट्रीय एकात्मता दृढ करण्यासाठी ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासून मोलाचे योगदान देत आहे'.'या वसतिगृहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आणि राहण्याचा सर्व खर्च उचलून त्यांना दर्जेदार शिक्षण दिले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने देशातील आदिवासी भाग आणि पूर्वांचल राज्यांच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. त्याच धर्तीवर मावळ लोकसभा मतदारसंघातील आदिवासी घटक आणि सामाजिक संस्थांना सातत्याने सहकार्य केले जात आहे. यापूर्वीही कर्जत तालुक्यातील आदिवासी भवनासाठी ५० लाखांचा निधी देण्यात आला होता, तसेच संस्थेला ॲम्ब्युलन्सदेखील उपलब्ध करून देण्यात आल्याचे'. खासदार बारणे यांनी सांगितले.

### शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या आमिषाने १० लाखांची फसवणूक

**पिंपरी : दैनिक संध्या**

शेअर मार्केटमध्ये मोठा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून १० लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना एप्रिल २०२४ ते १९ सप्टेंबर २०२६ या कालावधीत पिंपरी गाव परिसरात घडली. याप्रकरणी रवींद्र सुभाषराव शिलवंत (वय ४८, रा. श्री साई अपार्टमेंट, मंजुळा मासुळकर पार्क, पिंपरीगाव, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार उमेश हरिराम कलानी (वय अंदाजे २८, रा. कृष्णा सायकलसमोर, पिंपरी, पुणे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने स्वतःला यू.के. ग्रुप ऑफ कंपनीशी संबंधित असल्याचे सांगून फिर्यादी व इतरांना शेअर मार्केटमध्ये १० लाख रुपयांची गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. गुंतवणूक केल्यानंतर पहिल्या दहा महिन्यांत दरमहा एक लाख रुपये, म्हणजेच एकूण दहा लाख रुपये परत मिळतील तसेच त्यावरील नफाही दिला जाईल, असे आश्वासन आरोपीने दिले होते. मात्र, गुंतवणुकीनंतर आरोपीने ना मूळ रक्कम परत केली, ना कोणताही परतावा दिला. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादी यांनी पिंपरी पोलिसांकडे तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक चिरंजीव दलालवाड हे करीत आहेत.

### युवा मोर्चाच्या वतीने 'सेवा संकल्प अभियान'; NCMC कार्डचे वाटप

**पिंपरी : दैनिक संध्या**

देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा, पिंपरी-चिंचवड शहर जिल्ह्याच्या वतीने 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात आले. या अभियानांतर्गत भारतीय जनता युवा मोर्चाचे शहर जिल्हा सचिव श्री. जालिंदर महादेव काटे यांच्या पुढाकारातून नागरिकांना NCMC कार्डचे वाटप करण्यात आले. नागरिकांना दैनंदिन प्रवासासाठी तसेच विविध सार्वजनिक सुविधांचा लाभ घेण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या NCMC कार्डची माहिती देत त्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला सोसायटीतील ज्येष्ठ नागरिक, महिला, बंधू-भगिनी तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमास भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव श्री. अजितदादा कुलथे तसेच भाजपा युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहर जिल्हाध्यक्ष श्री. दिनेश भाऊ यादव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे मार्गदर्शक भरत अण्णा काटे, श्री. मच्छिंद्र काटे, मारुती काटे, कालिदास ढवळे यांच्यासह भारतीय जनता युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहराचे पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात सेवा आणि सामाजिक बांधिलकीचे विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याच भावनेतून पिंपरी-चिंचवड शहरातही युवा मोर्चाच्या माध्यमातून नागरिकांच्या उपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. 'सेवा हीच संघटनेची ओळख' या भावनेतून समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचून त्यांना आवश्यक सुविधा व माहिती उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या अभियानाच्या माध्यमातून करण्यात आला. या उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत NCMC कार्डचा लाभ घेतला. सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित उपयुक्त उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जालिंदर महादेव काटे, सचिव, भारतीय जनता युवा मोर्चा, पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### महिला शिक्षकांच्या हस्ते आरती

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवडमधील पहिला मानाचा गणपती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उन्नती सोशल फाऊंडेशनच्या 'उन्नतीच्या गणपती' च्या गणेशोत्सवात यंदाही सामाजिक बांधिलकीचा अनोखा संदेश देण्यात आला. पिंपळे सौदागर येथील पी. के. इंटरनॅशनल स्कूलमधील महिला शिक्षकांच्या शुभहस्ते गणरायाची मनोभावे आरती करण्यात आली. विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार, शिस्त आणि जीवनाला योग्य दिशा देणाऱ्या शिक्षकांच्या कार्याचा सन्मान आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा विशेष उपक्रम राबविण्यात आला. उन्नती सोशल फाऊंडेशनच्या वतीने दरवर्षी गणरायाच्या आरतीचा मान समाजातील विविध क्षेत्रांत निःस्वार्थपणे योगदान देणाऱ्या व्यक्ती आणि घटकांना दिला जातो. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता समाजातील प्रत्येक घटकाच्या योगदानाचा गौरव करणारा उत्सव व्हावा, ही या उपक्रमामागील भूमिका आहे. यापूर्वी उन्नतीच्या गणरायाच्या आरतीचा मान सफाई कामगार, दिव्यांग व्यक्ती, विधवा महिला, तृतीयपंथी बांधव यांच्यासह विविध समाजघटकांना देण्यात आला आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या योगदानाची दखल घेऊन त्यांचा सन्मान करण्याची परंपरा उन्नती सोशल फाऊंडेशन सातत्याने जपत आहे. यावेळी बोलताना उन्नती सोशल फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. कुंदाताई संजय भिसे म्हणाल्या, "उन्नतीचा गणपती हा केवळ फाऊंडेशनचा नसून पिंपळे सौदागर, रहाटणी आणि परिसरातील नागरिकांच्या श्रद्धेचा गणपती आहे.

# पदपथावर अतिक्रमण, सायकल ट्रॅकवर वाहने

## आता मालवाहू वाहनांचा ठिय्या!, फुटपाथ अन् सायकल ट्रॅक बंद; जड वाहनांमुळे वाहतूक कोंडीसह अपघाताचा धोका

■ **पिंपरी : (दै. संध्या)**

शहरातील पादचारी मार्ग, फुटपाथ आणि सायकल ट्रॅक अतिक्रमणाच्या विळख्यात सापडले असतानाच आता या मार्गांवर मालवाहू वाहने उभी करून मालाची चढ-उतार केली जात असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसत आहे. काही ठिकाणी ही वाहने रस्त्यावर आडवी उभी राहत असल्याने पदपथ आणि सायकल ट्रॅक तर बंद होतातच; तसेच मुख्य रस्त्याचा मोठा भाग व्यापला जात असल्याने वाहतूक कोंडीची भर पडत आहे. त्यामुळे 'साहेब, आम्ही चालायचे कुठून?' असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पिंपरी-चिंचवड शहरात नागरिकांसाठी स्वतंत्र पादचारी मार्ग आणि सायकल ट्रॅक तयार करण्यात आले आहेत. मात्र, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या सुविधांचा वापर पादचाऱ्यांऐवजी वाहनांसाठी होताना दिसतो. दुकाने, व्यावसायिक आस्थापना आणि गोदामांच्या परिसरात माल उतरविण्यासाठी मोठी वाहने थेट पदपथालगत किंवा सायकल ट्रॅकवर उभी केली जातात. वाहनाचा आकार मोठा असल्याने एकाच वेळी पदपथ सायकल ट्रॅक आणि रस्त्याचा काही भाग व्यापला जातो.यामुळे पादचाऱ्यांना मुख्य रस्त्यावरून चालण्याची वेळ येते. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान



मुले आणि दिव्यांग नागरिकांसाठी ही परिस्थिती धोकादायक ठरत आहे. सायकलस्वारांनाही ट्रॅक सोडून वाहनांच्या गर्दीतून मार्ग काढावा लागत आहे. शहरातील प्रमुख मार्गांवर दिवसाच्या वर्दळीच्या वेळेत मोठी मालवाहू वाहने उभी करून मालाची चढ-उतार केली जात असल्याने वाहतूक व्यवस्थेवरही परिणाम होत आहे. एखादे अवजड वाहन रस्त्यावर आडवे उभे राहिल्यास मागील वाहनांची रांग लागते. काही ठिकाणी वाहनचालकांना लेन बदलावी लागते, त्यामुळे कोंडीसोबतच अपघाताचा धोका वाढतो. शहरातील विविध व्यापारी भागांमध्ये मालवाहू वाहनांसाठी निश्चित चढ-उतार व्यवस्था आहे का, कोणत्या वेळेत मोठ्या वाहनांना प्रवेश दिला जातो आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर किती कारवाई होते, याबाबत स्पष्टता आवश्यक आहे.

महापालिका आणि वाहतूक पोलिसांकडून वेळोवेळी अतिक्रमणविरोधी कारवाई केली जाते. मात्र कारवाईनंतर काही दिवसांनी पुन्हा त्याच ठिकाणी वाहने उभी राहत असल्याचे चित्र अनेक भागांत दिसते. त्यामुळे केवळ कारवाई करून प्रश्न सुटणार नसून कारवाईनंतर त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होणार नाही, यासाठी सातत्याने देखरेख करण्याची गरज आहे. मोठ्या वाहनांची सततची ये-जा आणि त्यावर होणारा भार यामुळे अनेक ठिकाणी पदपथावरील पेव्हर ब्लॉक तुटलेले किंवा खचलेले दिसतात. नागरिकांच्या वापरासाठी तयार करण्यात आलेल्या पादचारी मार्गाची दुरवस्था होत असताना त्यावर पुन्हा दुरुस्तीचा खर्च करावा लागतो. त्यामुळे एकीकडे सार्वजनिक निधीतून सुविधा उभारायच्या आणि दुसरीकडे त्यांचे संरक्षण न केल्याने त्या खराब होऊ द्यायच्या, अशी विसंगत स्थिती निर्माण झाली आहे.सायकलस्वारांना सुरक्षित मार्ग मिळावा, वाहतूक कोंडी कमी व्हावी आणि पर्यावरणपूरक प्रवासाला चालना मिळावी, या उद्देशाने सायकल ट्रॅक उभारण्यात आले. मात्र त्याच ट्रॅकवर वाहने उभी राहत असतील तर या सुविधेचा उद्देशच बाजूला पडतो. सायकलस्वारांना ट्रॅक सोडून पुन्हा मुख्य रस्त्यावर यावे लागत असल्याने त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो.शहराच्या विकासात रस्ते रुंदीकरण, बीआरटी मार्ग, फुटपाथ आणि सायकल ट्रॅक यांसारख्या पायाभूत सुविधांवर मोठा भर दिला जात आहे. मात्र या सुविधांचा प्रत्यक्ष वापर सुरक्षितपणे आणि अडथळ्याविना होतो आहे का, याकडेही प्रशासनाने लक्ष देणे आवश्यक आहे. फुटपाथवर अतिक्रमण, सायकल ट्रॅकवर पार्किंग आणि रस्त्यावर मालवाहू वाहनांचा ठिय्या अशी परिस्थिती असेल तर शहराच्या वाहतूक नियोजनाचा फेरआढावा घेण्याची गरज निर्माण झाली आहे. शहरातील पादचारी मार्ग हे वाहनतळ किंवा माल उतरविण्याची जागा नसून नागरिकांच्या सुरक्षित प्रवासासाठी आहेत. त्यामुळे मोठ्या वाहनांसाठी निश्चित माल चढ-उतार क्षेत्रे, वेळेचे काटेकोर नियमन, फुटपाथ आणि सायकल ट्रॅकवरील अतिक्रमणावर सातत्यपूर्ण कारवाई आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे.

# १७ हजार ५०० अनधिकृत नळजोड आढळले

## १३ हजार ५०० झाले अधिकृत

■ **पिंपरी : (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत नळजोड नियमित करण्यासाठी राबविलेल्या विशेष मोहिमेला अल्प प्रतिसाद मिळाल्यानंतर महापालिकेने ठेकेदारामार्फत नळजोड शोध मोहीम हाती घेतली. आत्तापर्यंत 17 हजार 500 अनधिकृत नळजोड आढळून आले आहेत. त्यांपैकी 13 हजार 500 नळजोड नियमित करून पाणी मीटर बसविण्यात आले असून, त्यासाठी 26 कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. शहरात 25 हजारांहून अधिक नळजोड अनधिकृत असल्याचा प्रशासनाचा अंदाज असून, या कामासाठी एकूण 32 कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणार आहे.

शहरात सात लाख 84 हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. तर, सुमारे दोन लाख अधिकृत नळजोडधारकांची संख्या आहे. हाऊसिंग सोसायटी एकत्रित नळजोड आणि अनधिकृत नळजोडांमुळे मालमत्तांच्या तुलनेत नळजोडांची संख्या कमी दिसत असल्याचा प्रशासनाचा दावा आहे. शहरात तब्बल 40 टक्के पाण्याची गळती तसेच, पाणीचोरी होत असून, पाणीपट्टीतून अपेक्षित उत्पन्नही मिळत नाही. पाणी गळती, चोरी रोखण्यासाठी आणि उत्पन्न वाढीसाठी महापालिकेने अनधिकृत नळजोड नियमित करण्यासाठी सन 2023 मध्ये विशेष मोहीम राबविली. तीन वेळा मोहिमेला मुदतवाढ दिली. अनामत रक्कमही घेतली नाही. तरीही, नळजोड अधिकृत करण्यास नागरिकांचा प्रतिसाद मिळाला नाही.

महापालिकेच्या आठ क्षेत्रीय कार्यालयातून केवळ एक हजार 673 जणांनी नळजोड नियमित करण्यासाठी अर्ज केले. पाणीपुरवठा विभागाने नळजोड नियमित करण्याचे काम ठेकेदारामार्फत करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार अनधिकृत नळजोड सर्वेक्षण आणि मीटर बसविण्याचे 32 कोटींचे काम डिसेंबर 2024 पासून सुरू केले. कामाची मुदत 24 महिन्यांची आहे. आतापर्यंत शहरातील तीन लाख सात हजार 950 मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. झालेल्या सर्वेक्षणात झोपडपट्टीसह विविध भागात 17 हजार 500 हजार अनधिकृत नळजोड आढळून आले. त्यांपैकी 13 हजार 500 नळजोड अधिकृत करून मीटर बसविण्यात आले आहेत. त्यांना पाणीपट्टीची आकारणी सुरू केली. उर्वरित अनधिकृत नळजोडांची पडताळणी करण्यात येत आहेत. सर्वेक्षणाची मुदत संपण्यास चार महिने बाकी आहेत. चार महिन्याच्या मुदतीत सर्वेक्षण पूर्ण करून घेतले जाणार असल्याचे पाणीपुरवठा भागाने सांगितले. शहराला मावळातील पवना धरणातून 520 एमएलडी, आंद्रा धरणातून 90 एमएलडी, एमआयडीसीकडून 30 एमएलडी असे एकूण असे 640 एमएलडी पाणी दिवसाला दिले जाते. यांपैकी 40 टक्के पाण्याची गळती, चोरी होत असल्याचा पाणीपुरवठा विभागाचा दावा आहे. अधिकृत नळजोड, मीटर बसविल्यानंतर शहरातील पाणीगळती, चोरी कमी होईल.

# जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेचा उत्साहात प्रारंभ

■ **निगडी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व पुणे जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेला आज सेंट उर्सुला हायस्कूल, निगडी येथे उत्साहात प्रारंभ झाला. ही स्पर्धा दि. १९ ते २७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत होणार असून, १४, १७ व १९ वर्षांखालील मुले व मुली अशा विविध वयोगटांमध्ये स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

स्पर्धेचे उद्‌घाटन उपमहापौर सौ. शर्मिलाताई बाबर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी क्रीडा समिती सभापती श्री. कैलास कुटे, प्रशासन अधिकारी (क्रीडा) श्री. दत्तात्रय सूर्यवंशी यांच्यासह क्रीडा विभागातील अधिकारी, कर्मचारी, प्रशिक्षक, खेळाडू व क्रीडाप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा पर्यवेक्षक श्री. अरुण कडूस यांनी केले, तर सूत्रसंचालन श्रीमती सुनीता पालवे यांनी केले. उद्‌घाटनप्रसंगी श्री. राजेंद्र महाजन, सचिन ववले, निखिल सरीन, श्रीमती रोहिणी कदम, श्रीमती वर्षा थोरात तसेच त्यांचे सहकारी उपस्थित होते. १९ वर्षांखालील मुलांच्या सामन्यांचे निकाल १. सिम्बायोसिस ज्युनिअर कॉलेज विजयी विरुद्ध कमलनयन बजाज हायस्कूल – १४-०८ २. इंदिरा स्कूल विजयी विरुद्ध जय हिंद हायस्कूल – २०-०० ३. अक्षरा इंटरनॅशनल स्कूल विजयी विरुद्ध साधू वासवानी स्कूल – १८-०६ ४. कमलनयन बजाज हायस्कूल विजयी विरुद्ध ज्युनिअर कॉलेज – १४-०८ १९ वर्षांखालील मुलांच्या पुढील सामन्यांचे निकाल १. सिटी प्राईड ज्युनिअर कॉलेज विजयी विरुद्ध इंदिरा नॅशनल स्कूल – १३-०५ २. नोव्हेल ज्युनिअर कॉलेज विजयी विरुद्ध क्रीम सन अँड शॉप ग्लोबल स्कूल – ०८-०४ ३. सेंट उर्सुला हायस्कूल विजयी विरुद्ध नोव्हेल ज्युनिअर कॉलेज – २६-०० ४. एल प्रो स्कूल, चिंचवड विजयी विरुद्ध सिम्बायोसिस ज्युनिअर कॉलेज – २७-१० सदर जिल्हास्तरीय स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील विविध शाळा व महाविद्यालयांतील खेळाडू मोठ्या उत्साहाने सहभागी झाले असून, आगामी सामन्यांमध्येही चुरशीच्या लढती पाहायला मिळणार आहेत.

# गणराया 'या मस्तवाल सत्ताधाऱ्यांना सद्बुद्धी द्या

■ **पिंपरी (दै. संध्या)**

महाराष्ट्र राज्याचे माजी विरोधी पक्षनेते तथा आमदार अंबादासजी दानवे यांनी आज शनिवारी पिंपरी-चिंचवड शहराचा दौरा केला. दापोडी येथील शिवसेना विभागीय कार्यालयापासून त्यांच्या दौऱ्याला सुरुवात झाली. यावेळी शहराध्यक्ष चेतन पवार, यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, आजी-माजी पदाधिकारी, महिला पदाधिकारी, युवासेना तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दानवे यांनी पिंपरी येथील रोमी संधू यांच्या मंडळास भेट दिली. त्यानंतर रहाटणी येथील संघर्ष तरुण मित्र मंडळास भेट देऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला. पुढे त्यांनी पिंपरी-चिंचवड शिवसेना शहरप्रमुख चेतन पवार यांच्या निवासस्थानी भेट दिली. विविध गणेश मंडळे, शिवसेना शाखा, पदाधिकारी आणि ज्येष्ठ शिवसैनिकांच्या भेटीगाठीही त्यांनी घेतल्या. यावेळी बोलताना अंबादास दानवे यांनी राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगितले. राज्यातील विविध भागांतील दुष्काळी परिस्थितीचा उल्लेख करत गणरायाचरणी त्यांनी "राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. दुष्काळापासून मुक्ती मिळू दे, धो-धो पाऊस येऊ दे आणि शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना जनतेने योग्य तो धडा शिकवावा.

# नवनिर्माण विकास मंडळात पार्थिव शिवलिंगाची स्थापना

■ **पिंपरी : (दै. संध्या)**

वास्तुउद्योग कॉलनी, मासुळकर कॉलनी, पिंपरी येथील नवनिर्माण विकास मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त पार्थिव शिवलिंगाची विधिवत स्थापना करण्यात आली. यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भस्म आरतीने परिसरात भक्तिमय आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे.

भगवान शिवाच्या जयघोषात आणि मंत्रोच्चारात पार्थिव शिवलिंगाची पूजा-अर्चा करण्यात येत आहे. भस्म आरतीच्या वेळी उपस्थित भाविकांनी मोठ्या श्रद्धा, भक्तीभाव आणि उत्साहाने सहभाग नोंदवत भगवान शिवाचे दर्शन घेत आहेत.



# भाजपा युवा मोर्चाच्या सेवाभावी उपक्रमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप..!

■ **पिंपळे सौदागर (दै. संध्या)**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा, पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा यांच्या वतीने मोरवाडी येथील रेणुका देवी विद्या मंदिर येथे विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, पेन तसेच विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळावी आणि समाजातील प्रत्येक घटकापर्यंत सेवाभावी कार्य पोहोचावे, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

भाजपा युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा उपाध्यक्ष व कार्यक्रमाचे संयोजक मनोज मीरा मोहन घोडेकर तसेच आदम सिकंदर मुलानी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन त्यांना आवश्यक साहित्य उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

या उपक्रमासाठी रेणुका देवी विद्या मंदिरचे अध्यक्ष व नगरसेवक तुषार हिंगे तसेच संस्थापक सोनाली हिंगे यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या सहकार्याबद्दल आयोजकांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.



त्यांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमाला भाजपा संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस वैशाली खाडे, सरचिटणीस मधुकर बच्चे, भाजपा युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहर जिल्हाध्यक्ष दिनेश यादव, भाजपा युवा मोर्चा प्रदेश सचिव अजित कुलथे, भाजपा युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा सरचिटणीस राजेश डोंगरे, चिटणीस निखिल शहाणे, गोपाल मंडल, नितीन साळी, मंडल अध्यक्ष अक्षय कविटकर, विठ्ठल गवळी महाराज, जयदीप करपे, सामाजिक कार्यकर्ते इम्रान पठाण तसेच भाजपा युवा मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान दिसून आले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### हर्षवर्धन पाटील यांच्या निवासस्थानी गौरी-गणपतीची महाआरती व महानैवेद्य !

**इंदापूर : दैनिक संध्या**

इंदापूर येथे राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या भाग्यश्री बंगलो येथे गौरी-गणपतीची महाआरती व महानैवेद्याचा कार्यक्रम भक्तिभावाने व उत्साही वातावरणामध्ये शुक्रवारी (दि.18) संपन्न झाला. यानिमित्ताने गौरी-गणपतीसमोर आकर्षक सजावट करून देशातील बारा ज्योतिर्लिंगांचा सुंदर देखावा साकारण्यात आला आहे. भाग्यश्री बंगलो येथे गौरीचे विधिवत पूजनाने गुरुवारी (दि. 17) आगमन झाले. त्यानंतर नीरा भीमा सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षा भाग्यश्री पाटील, पुणे जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण खात्याचे सभापती अंकिता पाटील ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गौरी-गणपतीसमोर आकर्षक सजावट करण्यात आली आहे. या निमित्ताने गौरी-गणपती पूजन, आरती आदी धार्मिक कार्यक्रम धार्मिक वातावरणात संपन्न झाले. भाग्यश्री बंगलो येथे शुक्रवारी (दि. 18) सायंकाळी गौरी-गणपती दर्शनासाठी नागरिक आणि विशेषतः महिलांनी मोठ्या संख्येने गर्दी केली. यावेळी महाआरती प्रसंगी हर्षवर्धन पाटील, भाग्यश्री पाटील, निहारजी ठाकरे, अंकिता पाटील ठाकरे, राजवर्धन पाटील आदीसह पाटील कुटुंबिय उपस्थित होते. यावेळी सर्वांना महाप्रसाद देण्यात आला. दरम्यान, गौरी-गणपती उत्सवाच्या निमित्ताने नागरिकांमध्ये भक्तीभावाबरोबरच सामाजिक व सांस्कृतिक एकोपा निर्माण होण्यास मदत होत असल्याचे यावेळी हर्षवर्धन पाटील, भाग्यश्री पाटील, अंकिता पाटील ठाकरे, राजवर्धन पाटील यांनी सांगितले.

### चाकणला बुधवारी महिला महाआरतीचे तुफान नियोजन

**चाकण : दैनिक संध्या**

शताब्दी वर्षात यशस्वीपणे पदार्पण केलेल्या व चाकण पंचक्रोशीत सामाजिक उपक्रमात आघाडीवर असलेल्या येथील समस्त बालवीर मंडळाच्या वतीने बुधवारी (दि.२३) महिला महाआरती आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती श्री समस्त बालवीर मंडळाचे अध्यक्ष व जनता शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष संजय वाडेकर यांनी दिली. गणेश भक्तांना आणि चाकणकर नागरिकांना दिशा आणि प्रेरणा देणारे गणेश मंडळ म्हणून चाकण येथील श्री समस्त बालवीर मंडळाचा आवर्जून नामोउल्लेख केला जातो. जनता शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष व समस्त बालवीर मंडळाचे अध्यक्ष तसेच आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते संजय वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली हे मंडळ समाजाला विविध उपक्रमांच्या माध्यमातून प्रबोधन करत आहे. चाकण येथे बुधवारी सायंकाळी सहा वाजता येथील नेहरू चौकात बालवीर मंडळाच्या वतीने महिला महाआरती आयोजित करण्यात आली आहे. संजय वाडेकर यांनी सांगितले की, आरती वेळेवर सुरू होणार असल्याने महिलांनी पूजेचे साहित्य येताना घेऊन येणे अपेक्षित आहे. आरतीला उपस्थित राहणाऱ्या सर्व महिलांना रांका ज्वेलर्स तर्फे आकर्षक भेट वस्तू देऊन गौरव करण्यात येणार आहे. गर्दीचा उच्चांक पाहता मंडळाच्या वतीने यंदा उत्कृष्ट नियोजन करण्यात आले आहे.



### कामगार व कुटुंबियांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य, सिरम कंपनीतर्फे स्नेहमेळाव्याचे आयोजन

**लोणी काळभोर : दैनिक संध्या**

सिरम कंपनीच्या वतीने कंपनीतील कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी भव्य स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कामगारांनी वर्षभर कंपनीच्या प्रगतीसाठी केलेल्या योगदानाची दखल घेत, त्यांच्या कुटुंबीयांसोबत आनंदाचे काही क्षण घालवता यावेत, तसेच कामगार व व्यवस्थापन यांच्यातील स्नेहाचे नाते अधिक दृढ व्हावे, या उद्देशाने या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कंपनीचे चेअरमन डॉ. सायरस पुनावाला, कंपनीचे सीईओ आदर पुनावाला हे कंपनीतील कामगारांच्या प्रति नेहमीच अग्रेसर असुन त्यांनी दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे कामगार प्रतिनिधी, कामगार व त्यांच्या कुटुंबायांनी कौतुक करुन आभार मानले. या कार्यक्रमास कंपनीचे एचआर विभागाचे प्रमुख महेंद्र इंगे, सिनिअर जनरल मॅनेजर प्रविण गरकल, सिरम् एम्प्लॉईज युनियनचे संस्थापक अध्यक्ष सचिन तुपे, अध्यक्ष अजित भितांडे, उपाध्यक्ष अतुल कदम, सचिव अजित खैरे, खजिनदार सचिन गायकवाड, सदस्य प्रवीण घुले, गिरीश मोरे, कामगार उपस्थित होते. त्यांच्या कुटुंबीयांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. दैनंदिन कामाच्या व्यापातून काही काळ बाजूला होत कामगारांनी आपल्या कुटुंबीयांसोबत मनमुराद आनंद लुटला. कामगारांच्या या योगदानाचा सन्मान करण्याबरोबरच त्यांच्या कुटुंबीयांशीही आपुलकीचे संबंध निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांना महत्त्व असल्याचे यावेळी सांगण्यात आले. दरवर्षी सिरम कंपनी दहावी व बारावीच्या परिक्षेत ८०% टक्के गुण मिळविलेल्या कामगारांच्या मुलांना प्रोत्साहन म्हणून दहा हजार रुपये, मिठाई व भेट वस्तु देण्यात येते. यामुळे मुलांना अतिशय आंनद होतो. यावर्षी आपल्या कामगार बांधव कंपनी आणि कामगार यांच्यातील संबंध अधिक दृढ व्हावेत, तसेच कामगारांच्या कुटुंबीयांनाही कंपनीच्या परिवाराचा एक भाग असल्याची भावना निर्माण व्हावी,तसेच निवृत्त झालेल्या कामगारांना आपण जरी निवृत्त झालो तरी सतत कंपनीशी जोडले असल्याची भावना निर्माण व्हावी या उद्देशाने या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आलेल्या कामगारांच्या कुटुंबियांना बसने कंपनी दाखवून माहिती देण्यात आली. तसेच दुपारच्या वेळी आलेल्यांना जेवण देण्यात आले. कामगारांच्या कुटुंबियांनी कंपनी बघितल्या नंतर सांगितले की आम्ही सिरम कंपनीशी जोडले गेलो याचा आम्हाला अभिमान वाटतो. दहावी व बारावीच्या १५४ मुलांना प्रोत्साहन पर भेट व बक्षीस देण्यात आले. तर या वर्षी निवृत्त झालेल्या २ कामगांराचा सन्मान करण्यात आला. कंपनीमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या २२ कामगारांना 'उत्कृष्ट कामगार पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. कंपनीच्या प्रगतीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या कामगारांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान करण्यात आला. कामगारांनी आपल्या मेहनतीतून, शिस्तीतून आणि जबाबदारीने केलेल्या कार्यामुळे कंपनीच्या उत्पादनक्षमतेत व गुणवत्तेत भर पडत असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले.पुरस्कारामुळे कामगारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, भविष्यातही उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी प्रेरणा मिळणार असल्याची भावना कामगारांनी व्यक्त केली.



# पुरंदर तालुका नाभिक महामंडळाच्या अध्यक्षपदी सुशील गायकवाड

**■ पुरंदर (दै. संध्या)**

पुरंदर तालुका नाभिक महामंडळ कार्यकारिणीची नुकतीच बैठक संपन्न होवून तालुका अध्यक्षपदी नीरा येथील सुशील गायकवाड तर सचिवपदी सासवड येथील स्वप्नील उर्फ बंटी शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

पुरंदर तालुका नाभिक महामंडळाची कार्यकारिणी निवड व शूरवीर जिवाजी महाले जयंती कार्यक्रमाच्या नियोजनाची बैठक सासवड येथील आचार्य अत्रे सभागृहात झाली. कोअर कमिटीचे मुन्ना शिंदे,नितीन राऊत तसेच संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब साळुंखे व डॉ. मनोज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली. या बैठकीत मागील बारा वर्षे अध्यक्षपदावर राहुल मगर व कार्यकारिणीने उत्कृष्ट केलेल्या कार्याचा गौरव करण्यात आला. या बैठकीत अध्यक्षपदी सुशील गायकवाड,कार्याध्यक्ष मल्हार राऊत,उपाध्यक्ष मनोज जगताप,संजय क्षीरसागर,सचिव स्वप्नील शिंदे,सहसचिव प्रवीण साळुंखे,खजिनदार पांडुरंग काशिद कार्यकारिणी सदस्य संतोष पांडे,अमोल राऊत,रामदास क्षीरसागर,संतोष विभाड,अमोल गवळी, दत्तात्रय मोरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. शूरवीर जिवाजी महाले यांची शासकीय पातळीवर जयंती साजरी करावी. नाभिक समाजाचे शौर्याचे प्रतीक व छत्रपती शिवाजी महाराजांचे अंगरक्षक जिवाजी महाले यांची शासकीय पातळीवर जयंती साजरी व्हावी अशी मागणी समाजाचे नेते मुन्ना शिंदे यांनी केली असून या संदर्भात मुख्यमंत्री व सांस्कृतिक मंत्री यांच्याकडे निवेदन देण्यात येणार असल्याचे मुन्ना शिंदे यांनी सांगितले. १० ऑक्टोबर रोजी सासवड येथे जिवाजी महाले यांची जयंती साजरी करण्यात येणार असून यावेळी जिवाजी महाले यांच्या जीवन चरित्रावर व्याख्यान,समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा पुरस्कार देऊन सन्मान,तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे नवनिर्वाचित अध्यक्ष सुशील गायकवाड यांनी सांगितले. यावेळी सासवड शहर अध्यक्ष पोपट राऊत,अमित शिंदे,सूरज क्षीरसागर, जेजुरी शहर अध्यक्ष उमेश गायकवाड, नीरा शहर अध्यक्ष नंदकुमार काशवेद ,ज्येष्ठ कार्यकर्ते सुशील राऊत,वैभव शिंदे,बालाजी शिंदे आदी उपस्थित होते. नूतन कार्यकारिणीचे पुणे जिल्हा नाभिक महामंडळाचे अध्यक्ष नीलेश पांडे,चंद्रकांत जगताप यांनी अभिनंदन केले.

# एक कोटीहून अधिक किमतीचा गुटखा व पानमसाला जप्त

## चाकणला सिनेस्टाईल पाठलाग करून कारवाई

**■ चाकण (दै. संध्या)**

अन्न व औषध प्रशासनाने गुप्त माहितीच्या आधारे चाकण येथे मोठी कारवाई केली आहे. महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला तब्बल १ कोटी, १३ लाख ५४ हजार ६०० रुपये किमतीचा गुटखा आणि पानमसाला जप्त करण्यात आला. मध्य प्रदेशातून महाराष्ट्रात अवैध मार्गाने आणला जात असलेला हा माल पकडण्यासाठी प्रशासनाच्या पथकाने सुमारे सहा तास थरारक पाठलाग केला.

अन्न व औषध प्रशासनाला शुक्रवारी (दि. १८) दुपारी एका गुप्त खबऱ्याकडून माहिती मिळाली की, प्रतिबंधित गुटख्याची एक मोठी खेप मध्य प्रदेशातून समृद्धी महामार्गाने भिवंडी, ठाणे येथे आणली जात आहे. ही माहिती मिळताच अन्न व औषध प्रशासनाच्या पथकांनी त्वरित धावपळ सुरू केली. मिळालेल्या माहितीनुसार, हा ट्रक ठाण्याऐवजी संगमनेरमार्गे पुण्याच्या दिशेने जात असल्याचे आढळून आले. वाहनाने मार्ग बदलल्याचे लक्षात येताच प्रशासनाच्या पथकांनी संभाव्य मार्गांवर तातडीने धाव घेतली.

ठाणे विभागाचे पथक मुरबाडच्या दिशेने, तर पुणे विभागाचे पथक राजगुरुनगर येथे तैनात करण्यात आले. राजगुरुनगर टोलनाक्यावर अन्न सुरक्षा अधिकारी लक्ष्मीकांत सावळे यांनी ट्रक अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र, चालकाने वाहन न थांबवता वेगाने पुढे नेले. यानंतर सावळे यांनी ट्रकचा पाठलाग सुरू ठेवला. स्थानिक पोलिसांच्या मदतीने चाकण येथील तळेगाव चौकात अखेर ट्रकला शिताफीने अडविण्यात यश आले.

सुमारे सहा तासांच्या थरारक पाठलागानंतर शुक्रवारी रात्री नऊ वाजण्याच्या दरम्यान संबंधित ट्रक ताब्यात घेण्यात आला. ट्रकची तपासणी केली असता त्यात महाराष्ट्रात पूर्णपणे प्रतिबंधित असलेला विविध कंपन्यांचा पानमसाला, सुगंधित तंबाखू, गुटखा असा मोठा साठा आढळून आला. याशिवाय वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले वाहन असा एकूण १,१३,५४,६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अन्न सुरक्षा अधिकारी यांनी तातडीने संपूर्ण मुद्देमाल ताब्यात घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली. रजनीगंधा फ्लेवर्ड पानमसाला - २९,९५,२०० रुपये. तुळशी रॉयल जाफरानी जर्दा - ९,६०,००० रुपये. तानसेन सुगंधित पानमसाला - २४,९४,८०० रुपये. टी.ओ.प्रिमियम जर्दा - २,६४,६०० रुपये. आर.एम.डी.पानमसाला - २६,४०,००० रुपये. ट्रक (क्र. एमएच १८ बीझेड २३५०) रक्कम २०,००,००० रुपये. जप्तीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली. याप्रकरणी वाहनचालक नफीस मेहबूब खान (वय ४०, रा. हरियाणा), मालक व पुरवठादार निलेश राठी (रा. खामगाव, जि. बुलढाणा), अरुण पाटील (रा. जळगाव) आणि वाहन मालक जेएमडी इंटरप्राईजेस (धुळे), तसेच वाहतूकदार संजय माटा (रा. इंदूर, मध्य प्रदेश) यांच्यावर चाकण उत्तर पोलीस ठाण्यात शनिवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला.

हा प्रकार केवळ अन्न सुरक्षा कायद्याचे उल्लंघन नसून, सार्वजनिक आरोग्याशी खेळणारा एक संघटित आणि सातत्यपूर्ण बेकायदेशीर व्यापार असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे या गुन्ह्यातील आरोपींचे पूर्व गुन्हे, पुरवठा साखळी आणि आर्थिक व्यवहार तपासून दोषी आढळल्यास त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ अंतर्गत कडक कारवाई करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याची विनंती अन्न व औषध प्रशासनातर्फे पोलिसांना करण्यात आली आहे.

### कारवाईत सातत्य ठेवणार

"साठवणूक व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कठोर व सातत्यपूर्ण कारवाई करण्यात येणार आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अशा बेकायदेशीर प्रकारांना आळा घालण्यासाठी विभागामार्फत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या कारवाईमुळे अवैध गुटखा व्यवसायाला मोठा धक्का बसला असून, जनतेच्या आरोग्याच्या रक्षणासाठी प्रशासनाची कटिबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे."




# दोडका, गवार, रताळी, टोमॅटो, वांगी, वाटाणा यांची विक्रमी आवक

**■ चाकण (दै. संध्या)**

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये दोडका, गवार, रताळी, टोमॅटो, वांगी, वाटाणा, आद्रक व हिरव्या मिरचीची विक्रमी आवक झाली. पालेभाज्यांचे भाव तेजीत राहिले आहेत. राजकोटच्या भुईमूग शेंगांना प्रचंड मागणी आहे. एकूण उलाढाल ५ कोटी १५ लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १ हजार २५० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव १,८०० ते ४,८०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक २,१५० क्विंटल झाली. बटाट्याला कमाल भाव २,००० रुपये मिळाला. लसणाची एकूण आवक ५० क्विंटल झाली. लसणाला कमाल भाव १८ हजार रुपये मिळाला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३१५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ३ हजार रुपयां पासून ते ४ हजार रुपयांपर्यंत कमाल भाव मिळाला.

### शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे

कांदा - एकूण आवक - १,२५० क्विंटल. भाव क्रमांक - १. ४,८०० रुपये, भाव क्रमांक २. ३,५०० रुपये, भाव क्रमांक ३. १,८०० रू. बटाटा - एकूण आवक - २,१५० क्विंटल. भाव क्रमांक १. २,००० रुपये, भाव क्रमांक २.१,२०० रुपये, भाव क्रमांक ३.८०० रुपये. फळभाज्या : फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे - टोमॅटो - ३३६ क्विंटल (१,००० ते १,५०० रू.), कोबी - २३३ क्विंटल (६०० ते ८०० रू.), फ्लॉवर - २१५ क्विंटल (१,००० ते १,८०० रु.), वांगी - ८२ क्विंटल (१,००० ते २,५०० रु.), भेंडी - १०९ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), दोडका - ६५ क्विंटल (२,००० ते ३,५०० रु.), कारली - ७३ क्विंटल ( २,००० ते २,५०० रु.), दुधीभोपळा - ४८ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), काकडी - ८७ क्विंटल (१,५०० ते ३,००० रु.), फरशी - ४२ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), वालवड - ७४ क्विंटल (१,५०० ते २,५०० रुपये), ढोबळी मिरची - १४९ क्विंटल (१,००० ते २,५०० रु.), चवळी - ४८ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), शेवगा - ३२ क्विंटल (३,००० ते ४,५०० रु.), गाजर - १८० क्विंटल (१,००० ते २,००० रु.), गवार - ६४ क्विंटल (३,००० ते ६,००० रु. ), आले - १७५ क्विंटल (७,००० ते १३,००० रु. ),. रताळी - ६० किंवटल (४,००० ते ५,५०० रु.), वाटाणा - १५५ क्विंटल (४,००० ते ५,००० रु.), भुईमूग शेंगा - १५५ क्विंटल (४,५०० ते ५,५०० रु.)



# शेलू परिसरातील जल प्रदूषणाची प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून गंभीर दखल

**■ चाकण (दै. संध्या)**

चाकण औद्योगिक टप्पा क्रमांक दोन परिसरातील कंपन्यांमधून सोडण्यात येणाऱ्या दूषित व रासायनिकयुक्त पाण्यामुळे शेलू ग्रामपंचायत हद्दीतील परिसरातील जलप्रदूषणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या समस्येबाबत ग्रामपंचायतीने दिलेल्या तक्रारीची गंभीर दखल घेत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे यांनी लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांसमवेत संबंधित परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली.

ग्रामस्थांच्या व ग्रामपंचायतीच्या तक्रारीनुसार, कंपनी परिसरातून ओढ्यांमध्ये सोडल्या जाणाऱ्या केमिकल युक्त पाण्यामुळे ओढ्या शेजारील विहिरींचे पाणी अत्यंत दूषित झाले आहे. विहिरीतील मासे तडफडून मृत्युमुखी पडत आहेत. परिणामी, हे पाणी पिण्यायोग्य किंवा वापरण्यायोग्य राहिलेले नाही. सदर ओढ्याचे पाणी पुढे नदीला जाऊन मिळत असल्याने गावाची पिण्याच्या पाण्याची मोठी अडचण निर्माण झाली आहे. शेतीसाठी हेच पाणी वापरले जात असल्याने पिकांना दूषित पाणी देताना शेतकऱ्यांना त्वचा रोगासारख्या गंभीर आजारांना सामोरे



जावे लागत असल्याचे शेलू ग्रामस्थांनी सांगितले. या सर्व गंभीर परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून नितीन गोरे यांनी सदर तक्रारीची तातडीने दखल घेऊन ग्रामस्थांना दिलासा दिला आहे.

**पाण्याचे नमुने तपासणीसाठी :** पाण्याचे नमुने त्वरित तपासणीसाठी घेण्याचे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित कंपन्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पुणे प्रादेशिक अधिकाऱ्यांना दिले असल्याचे नितीन गोरे यांनी सांगितले.

"नागरिकांच्या भावनांची कदर करून कंपन्यांनी केमिकल युक्त पाणी ओढ्यांमध्ये सोडणे टाळले पाहिजे. पिके दूषित होणार नाही, याचा कंपनी व्यवस्थापनाने बारकाईने विचार करण्याची गरज आहे.", असे नितीन गोरे, सदस्य, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी सांगितले.

पाहणी दौऱ्यावेळी खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अनुराग जैद, पोलीस पाटील निशांत करंडे, सरपंच उल्हास चोरघे, अक्षय गाडे, संदीप बधाले, पोपटराव पडवळ, कैलास पडवळ, उपसरपंच साहेबराव कडूसकर, चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक गुलाब शेवकरी, ग्रामसेवक तानाजी पाटील आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### आयुर्वेदिक वृक्षांचे वाटप -'एक घर-एक औषधी वृक्ष'; धामारीत आयुर्वेदाचा जागर

**कवठे येमाई: दैनिक संध्या**

आरोग्यासोबत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत 'आयुष ग्राम' उपक्रमातून आयुष्मान आरोग्य मंदिर (आयुष), धामारी ता.शिरूर येथे विविध आयुर्वेदिक वृक्ष व औषधी वनस्पतींच्या रोपांचे तसेच ट्री गार्डचे वाटप करण्यात आले. आयुष ग्राम उपक्रमातून हिरडा, बेहडा, आवळा, अर्जुन सह रक्तचंदन, पारिजातक, ब्राह्मी, कांचन व अडुळसा आदी रोपांचे वाटप करण्यात आले. 'वृक्ष लावा-आरोग्य जपा' आणि 'एक घर-एक औषधी वृक्ष' या संदेशातून नागरिकांनी रोपांचे संगोपन करण्याचे आवाहन करण्यात आले. न्यू इंग्लिश स्कूल धामारीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आयुर्वेदिक वनस्पतींचे महत्त्व जाणून घेतले. आरोग्य, आयुर्वेद, योग आणि पर्यावरण संवर्धन यांची सांगड घालणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमास पंचायत समिती सदस्या वंदनाताई प्रकाश पवार, प्रथम नागरिक सीमाताई शेळके, दत्तोबा दादा भगत, मुख्याध्यापक सोनवणे, डॉ. वाघमोडे, समुदाय अधिकारी सारिका राठोड, योग प्रशिक्षक अंकुश घारे यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. आरोग्य सहाय्यक सचिन बुगे यांनी आभार मानले

### मामाचा खून करून भाच्याची आत्महत्या, राजगुरुनगर हादरले

**राजगुरुनगर : दैनिक संध्या**

आजारपणात भाच्याच्या घरी राहण्यासाठी आलेल्या मामाचा भाच्यानेच धारदार कोयत्याने वार करून खून केला. त्यानंतर भाच्यानेही गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना राजगुरूनगर येथील माधवनगर परिसरात शनिवारी (दि १९) घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संदीप वामन गडदे (वय ४३) असे खून झालेल्या मामाचे नाव असून, प्रवीण कैलास कोहिणकर (वय २०) असे आत्महत्या केलेल्या भाच्याचे नाव आहे. पोलिसांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, संदीप गडदे हे गेल्या काही महिन्यांपासून आजारी होते. उपचार तसेच देखभालीसाठी ते सुमारे दोन महिन्यांपूर्वी माधवनगर येथील भाचा प्रवीण कोहिनकर याच्या घरी राहण्यासाठी आले होते. मात्र, शनिवारी सकाळी प्रवीणने धारदार कोयत्याने संदीप गडदे यांच्या गळ्यावर वार केल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या संदीप यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. यानंतर प्रवीणने त्याच घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. एकाच घरात मामाचा रक्ताच्या थारोळ्यातील मृतदेह आणि भाच्याचा गळफास घेतलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळल्याने कुटुंबीयांसह परिसरातील नागरिकांना मोठा धक्का बसला. घटनेची माहिती मिळताच खेड पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करताना पोलिसांना प्रवीणने लिहिलेली सुसाईड नोट मिळाली. त्यामध्ये 'मामाच्या त्रासाला कंटाळून हे पाऊल उचलत आहे,' असा उल्लेख असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. खेड पोलिस सुसाईड नोटसह घटनास्थळावरील इतर पुरावे तपासण्यात येत आहेत. अधिक तपास खेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण करीत आहेत.

### खळदच्या लढ्याला अखेर यश; कऱ्हा नदीवर पाच कोटींची संरक्षण भिंत मंजूर

**नाझरे सुपे पुरंदर : दैनिक संध्या**

वारंवार होणाऱ्या अतिवृष्टी आणि कऱ्हा नदीच्या महापुराच्या छायेत असलेल्या खळद गावासाठी अखेर दिलासादायक बातमी आली आहे. नदीकाठच्या गावाचे पुरापासून संरक्षण करण्यासाठी तब्बल पाच कोटी रुपयांची भक्कम संरक्षक भिंत मंजूर झाली असून, ग्रामस्थांच्या तब्बल सात ते आठ वर्षांच्या प्रदीर्घ पाठपुराव्याला यश आले आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी या कामाला प्रशासकीय मान्यता दिल्याची माहिती पुरंदर-हवेलीचे माजी आमदार संजय चंदुकाका जगताप यांनी दिली. २०१९ मध्ये कऱ्हा नदीला आलेल्या महापुराने खळद गावठाणाचे मोठे नुकसान केले होते. पुराचे रौद्ररूप धारण केलेले पाणी थेट गावात घुसल्याने अनेक घरांचे, संसारांचे आणि शेतीचे अतोनात नुकसान झाले होते. गाव जरी तुलने उंचावर वसलेले असले तरी दरवर्षी होणाऱ्या मुसळधार पावसामुळे नदीचे पात्र सातत्याने गावाच्या दिशेने सरकत आहे. त्यामुळे भविष्यात एखादी मोठी दुर्घटना घडण्याची भीती ग्रामस्थांच्या मनात होती. त्यातही खंडोबाचीवाडी परिसरात नदीने आपले मूळ पात्र सोडून थेट शेतातून नवा प्रवाह तयार केल्याने बळीराजा पुरता उद्ध्वस्त झाला होता. उभ्या पिकांसह सुपीक जमीन वाहून गेल्याने शेतकरी हवालदिल झाले होते. तेव्हापासूनच ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांनी एकमुखाने संरक्षण भिंतीची मागणी लावून धरली होती.

### कर्तव्य बजावताना फौजदाराचा दुर्दैवी अंत



**नाझरे सुपे पुरंदर : दैनिक संध्या**

पुणे ग्रामीण पोलीस दलातील उरुळी कांचन पोलीस ठाण्यात कर्तव्य बजावत असलेले सहाय्यक फौजदार गणेश रतन दाभाडे यांचा अपघाती मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. पोलीस ठाण्याच्या हद्दीतील श्रीकृष्ण मंगल कार्यालयाजवळ रात्री सव्वाबारा वाजण्याच्या सुमारास हा भीषण अपघात झाला. कर्तव्याशी एकनिष्ठ राहून प्रामाणिकपणे सेवा बजावणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याचा असा अकाली अंत झाल्याने संपूर्ण पोलीस दलात हळहळ व्यक्त होत आहे. गणेश दाभाडे हे मूळचे धुळे जिल्ह्यातील रहिवासी असून आदिवासी समाजातून आलेले आहेत. अत्यंत प्रतिकूल आणि हलाखीच्या परिस्थितीवर मात करत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले आणि जिद्दीच्या जोरावर पोलीस दलात भरती झाले. उरुळी कांचन पोलीस ठाण्यात ते गेल्या काही काळापासून अत्यंत निष्ठेने आणि प्रामाणिकपणे कर्तव्य बजावत होते. त्यांच्या अशा अचानक जाण्याने आदिवासी समाजातही शोककळा पसरली आहे. या घटनेची माहिती मिळताच आदिवासी समाजसेवक नामदेव भोसले यांनी पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक यांच्याशी थेट दूरध्वनीवरून संपर्क साधून घटनेची सविस्तर माहिती दिली. उरुळी कांचन महामार्ग परिसरात सातत्याने होणाऱ्या अपघातांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची आग्रही मागणी त्यांनी यावेळी केली. वास्तविक पाहता उरुळी कांचन परिसरातील महामार्ग हा अपघातप्रवण बनला असून मृत्यूचा सापळा ठरत आहे.

# भय, विनोद आणि शतकानुशतकांपासूनचा जुना शाप

## 'भूतम् भयम्'मधून भन्नाट पारलौकिक साहसाचा अनुभव

■ पुणे(दै. संध्या)

नेहमीच्या हॉरर चित्रपटांपेक्षा वेगळ्या अलौकिक साहसाचा अनुभव घेण्यासाठी सज्ज व्हा. 'भूतम् भयम्'चा प्रीमियर 25 सप्टेंबर 2026 रोजी केवळ मराठी झी5वर होणार आहे. या चित्रपटातून रामचंद्र गावकर दिग्दर्शनात पदार्पण करत आहेत. भय, विनोद, रहस्य आणि साहस यांचा अनोखा मिलाफ या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. कोणतीही वस्तू सोन्यात बदलण्याची शक्ती असलेले एक प्राचीन नाणे या हटके कल्पनेभोवती चित्रपटाची कथा फिरते.

झी स्टुडिओज मराठी प्रस्तुत आणि कायरा कुमार क्रिएशन्सच्या बॅनरखाली निर्मिती करण्यात आलेल्या 'भूतम् भयम्'मध्ये छाया कदम, पुष्कराज चिरपुटकर, करण सोनावणे, नील साळेकर, सौरभ घाडगे आणि शुभम जाधव यांच्यासह नव्या पिढीतील अनेक गुणी कलाकारांच्या भूमिका आहेत.

सात बेरोजगार मित्रांना एक रहस्यमय नाणे सापडते आणि झटपट श्रीमंत होण्याचा मार्ग म्हणून ते या नाण्याकडे पाहू लागतात. मात्र, त्यातूनच ते 'राणीवाडा' या ओसाड हवेलीच्या भयावह आणि गूढ जगात ओढले जातात. या हवेलीत अनेक शतकांपूर्वीचा शाप दडलेला असतो. भयावह प्रसंग आणि विक्षिप्तपणातून निर्माण होणारा विनोद यांचा समतोल साधत 'भूतम् भयम्'मधून हॉरर-कॉमेडीला वेगळे स्वरूप देण्यात आले आहे. अलौकिक घटनांमधील रहस्याला विनोद, साहस आणि उत्कंठेची जोड देतानाच मैत्री, लोभ, जगण्यासाठीची धडपड आणि सहज मिळणाऱ्या संपत्तीचे आकर्षण यांचाही वेध चित्रपटातून घेण्यात आला आहे. हटके मध्यवर्ती कल्पना, विविध व्यक्तिरेखांची धमाल टीम आणि पुढे काय घडणार याचा अंदाज बांधता न येणारी कथा यांच्या माध्यमातून नेहमीच्या वाटेने न जाणारा अलौकिक मनोरंजनाचा अनुभव या चित्रपटातून मिळणार आहे. भयासोबतच प्रेक्षकांना भरपूर हसवणारे प्रसंगही यात पाहायला मिळणार आहेत.

महत्त्वाचा तपशील : शीर्षक : भूतम् भयभयम् भाषा : मराठी प्रकार : हॉरर कॉमेडी प्रीमियर : 25 सप्टेंबर 2026 दिग्दर्शक : रामचंद्र गावकर निर्मिती : झी स्टुडिओज मराठी प्रस्तुत; कायरा कुमार क्रिएशन्सच्या बॅनरखाली निर्मिती

कलाकार : छाया कदम, पुष्कराज चिरपुटकर, करण सोनावणे, नील साळेकर, सौरभ घाडगे, सिद्धांत सरफरे, मनमीत पेम आणि प्रियदर्शन जाधव

स्ट्रीमिंग : केवळ मराठी झी5वर

'भूतम् भयम्'ची कथा काय आहे? सात बेरोजगार मित्रांना एक प्राचीन आणि रहस्यमय नाणे सापडते. कोणतीही वस्तू सोन्यात बदलण्याची शक्ती या नाण्यात असल्याचे मानले जाते आणि इथूनच त्यांचा अनपेक्षित साहसी प्रवास सुरू होतो. श्रीमंत होण्याच्या लालसेपोटी हे मित्र 'राणीवाडा' नावाच्या एका ओसाड हवेलीत जातात. मात्र, त्या हवेलीच्या भिंतींआड दडलेल्या गडद रहस्यांची त्यांना कल्पनाही नसते. संपत्तीची लालसा वाढत असतानाच या नाण्यासोबत शतकानुशतके जुना शापही जोडलेला असल्याचे त्यांच्या लक्षात येते. त्यांचा मित्र गजा अचानक रहस्यमयरीत्या बेपत्ता होतो आणि परिस्थिती आणखी भयावह वळण घेते. त्यानंतर या मित्रांना




आपल्या भोवती असलेल्या अलौकिक शक्तींचा सामना करावा लागतो. भयावह प्रसंग, विनोदातून निर्माण होणारा गोंधळ आणि अनपेक्षित वळणांनी भरलेल्या 'भूतम् भयम्'मध्ये मैत्री, लोभ आणि जगण्यासाठीची धडपड यांची कथा भय आणि विनोदाची सांगड घालत मांडण्यात आली आहे.

'भूतम् भयम्'ची वैशिष्ट्ये :

भय, विनोद, रहस्य आणि साहस यांचा अनोखा मिलाफ कोणतीही वस्तू सोन्यात बदलण्याची ताकद असलेल्या प्राचीन नाण्याभोवती फिरणारी हटके कथा प्रेक्षकांना 'राणीवाड्या'च्या गूढ आणि भयावह जगात घेऊन जाणारी कथा करण सोनावणे, नील साळेकर, सौरभ घाडगे, शुभम जाधव आणि छाया कदम यांच्यासह नव्या पिढीतील कलाकारांचा सहभाग सात मित्रांचा शतकानुशतके जुन्या शापाशी सामना झाल्यानंतर लोभ, मैत्री आणि जगण्यासाठीची धडपड यांच्यात निर्माण होणारा संघर्ष रामचंद्र गावकर यांचे दिग्दर्शकीय पदार्पण भयावह प्रसंग, भरपूर विनोद आणि अनपेक्षित वळणांनी भरलेला मनोरंजक अलौकिक प्रवास

अधिकृत प्रतिक्रिया : दिग्दर्शक रामचंद्र गावकर म्हणाले, "'भूतम् भय'चा प्रवास माझ्यासाठी खूप खास आहे. विशेषतः दिग्दर्शक म्हणून हा माझा पहिलाच पूर्ण लांबीचा चित्रपट असल्यामुळे त्याचे महत्त्व आणखी वेगळे आहे. भय, विनोद आणि साहस यांची सांगड घालत प्रेक्षकांचे मनापासून मनोरंजन करणारी कथा मला तयार करायची होती. सात मित्रांना त्यांचे आयुष्य बदलून टाकू शकणारी एक वस्तू अचानक सापडते आणि नंतर त्यासोबत एक धोकादायक शापही जोडलेला असल्याचे त्यांना समजते. या कल्पनेमुळे आम्हाला विनोदासोबतच उत्कंठाही निर्माण करण्यासाठी भरपूर वाव मिळाला. मराठी झी5वर ही वेगळी कथा प्रेक्षकांना अनुभवता येणार असल्यामुळे मी खूप उत्सुक आहे."

छाया कदम म्हणाल्या, "'भूतम् भयम्'मध्ये काम करण्याचा अनुभव माझ्यासाठी खूप वेगळा होता. या चित्रपटात भय आणि विनोद यांचा अनोखा मिलाफ आहे. टीमने उभे केलेले या कथेचे विश्व गूढ वाटते आणि त्याच वेळी मनोरंजकही आहे. काही प्रसंग तुम्हाला हसवतील, तर काही प्रसंगांमध्ये पुढे काय होणार याची उत्सुकता कायम राहील. ही कथा प्रेक्षकांसमोर येण्यासाठी मी उत्सुक आहे. 'भूतम् भयम्' हा एक खास अनुभव करणारी धमाल गोंधळ, रहस्य आणि अलौकिक घटनांचा प्रेक्षकांनी मनमुराद आनंद घ्यावा, असे मला वाटते."

पुष्कराज चिरपुटकर म्हणाले, "'भूतम् भयम्'च्या कथेत पुढे काय घडेल याचा अंदाज बांधता येत नाही आणि हीच गोष्ट मला या चित्रपटाकडे सर्वाधिक आकर्षित करणारी होती. मैत्री, लोभ, विनोद आणि अलौकिक घटनांची या चित्रपटात अशा प्रकारे सांगड घालण्यात आली आहे की कथा सतत पुढे सरकत राहते. माझे पात्र अशा मित्रांच्या गटातील एक आहे, जे त्यांच्या कल्पनेपलीकडच्या परिस्थितीत अडकतात. रहस्य हळूहळू उलगडत असताना या मित्रांमधील समीकरणे कशी बदलतात, हा अनुभव खूपच रंजक होता. चित्रपटात विनोद आणि उत्कंठा यांचा उत्तम समतोल साधण्यात आला आहे. या भन्नाट प्रवासात आमच्यासोबत सहभागी होताना प्रेक्षकांनाही खूप मजा येईल, असे मला वाटते. मराठी झी5वरील डिजिटल प्रीमियरची मी आतुरतेने वाट पाहत आहे."

'भूतम् भयम्' 25 सप्टेंबर 2026पासून केवळ मराठी झी5वर स्ट्रीम होणार आहे.

झी5 हा भारतातील सर्वात मोठा स्वदेशी व्हिडिओ स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म असून, दक्षिण आशियाई कंटेंट जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणारे जागतिक व्यासपीठ आहे. झी5ची सेवा 190हून अधिक देशांमधील प्रेक्षकांपर्यंत पोहोचली आहे. झी एंटरटेनमेंट एंटरप्रायझेस लिमिटेडचे डिजिटल मनोरंजन व्यासपीठ असलेल्या झी5वर भाषेला प्राधान्य देणारा प्लॅटफॉर्म अनुभव उपलब्ध करून देण्यात आला आहे. हायपर-लोकल कंटेंट, भाषेनुसार स्वतंत्र पॅक आणि हिंदी, तमिळ, तेलुगू, मराठी, मल्याळम, कन्नड आणि बंगाली या सात भाषांमध्ये अत्यंत वैयक्तिक स्वरूपाचा अनुभव उपलब्ध करून देण्यात येतो.

## अंधश्रद्धेवर प्रहार करणारे ' या भोंदूंनी तुला गंडवलं ' जिवंत देखावा गाजतोय

■ चाकण(दै. संध्या)

अंधश्रद्धा, भोंदूबाबांकडून फसवणूक आणि समाजातील गैरसमजांविरोधात जनजागृती करणारे ' या भोंदूंनी तुला गंडवलं ' हा जिवंत देखावा चाकण मध्ये प्रचंड गाजू लागला आहे.



चाकण येथील आझाद हिंद मंडळाने माणिक चौकात हा जिवंत देखावा सादर केला आहे. दीपक मांडेकर यांच्या नेतृत्वाखाली कलाकार हा देखावा सादर करत आहेत. अंधश्रद्धेच्या नावाखाली सर्वसामान्यांची होणारी फसवणूक, भोंदूगिरी आणि त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्यांवर भाष्य करत वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकाची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न या देखाव्यातून समाजापुढे मांडण्यात आला आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून मनोरंजनासोबतच सामाजिक प्रबोधनाचा संदेश देण्याच्या उद्देशाने हा विशेष जिवंत देखावा मंडळाने सादर केला असल्याचे आझाद हिंद मंडळाचे अध्यक्ष व नगरसेवक शशिकांत जाधव, मयूर भूरूक, अभिजीत जाधव, अशोक जाधव आदींनी सांगितले. आझाद हिंद मंडळ चाकण परिसरात सांस्कृतिक, सामाजिक आणि कलाविषयक उपक्रम राबवत आहे. गणेशोत्सवानिमित्त सुरू असलेला हा देखावा आणखी आठ दिवस गणेशभक्तांसाठी सादर करण्यात येणार आहे. मनोरंजनासोबतच सामाजिक प्रबोधनाचा संदेश देणारा हा देखावा पाहण्यासाठी गणेशभक्तांची तुफान गर्दी होत आहे. नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, गटनेते नितीन गोरे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे, नगरसेविका सुवर्णा राक्षे, नगरसेवक मंगेश कांडगे, साहेबराव कड, करण सोनवणे, विजया जाधव, स्मिता जाधव आदींनी आझाद हिंद मंडळाला भेट देऊन कार्यकर्त्यांचे कौतुक केले.

## 'अनेकान्त स्कूल'चा तालुकास्तरीय फुटबॉल स्पर्धेत दुहेरी धमाका !

■ पिंपरी (दै. संध्या)

बारामतीच्या अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी माळेगाव येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय फुटबॉल स्पर्धेत दैदिप्यमान यश संपादन करत आपला दबदबा निर्माण केला आहे. या अटीतटीच्या स्पर्धेत शाळेच्या १४ वर्षांखालील मुलांच्या संघाने तसेच १७ वर्षांखालील मुलांच्या संघाने उत्कृष्ट आणि आक्रमक खेळ करत अनुक्रमे प्रथम क्रमांक पटकावला आहे.

दोन्ही वयोगटातील संघांनी आपल्या चमकदार कामगिरीच्या जोरावर जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेसाठी दिमाखात आपली निवड निश्चित केली आहे. या यशाबद्दल अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. श्री. जवाहर शहा (वाघोलीकर), सचिव मा. श्री. मिलिंद शहा (वाघोलीकर), शाळेचे चेअरमन मा. श्री. चंद्रवदन शहा (मुंबईकर), शाळेचे व्यवस्थापक मा. श्री. धवल शहा (वाघोलीकर), शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सन्माननीय सदस्य तसेच शाळेच्या प्राचार्या मा. प्रणाली वडेर या सर्वांनी विजयी खेळाडूंचे कौतुक करत पुढील यशस्वी वाटचालीसाठी व आगामी स्पर्धांसाठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.



## ओतूर पोलिसांच्या विविध प्रकरणांत आरोपींना दंडाची शिक्षा

■ ओतूर (दै. संध्या)

ओतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दाखल असलेल्या मोटार वाहन कायदा तसेच भारतीय न्याय संहितेअंतर्गत विविध प्रकरणांमध्ये आरोपींनी न्यायालयात गुन्हा कबूल केल्यानंतर जुन्नर येथील न्यायालयाने त्यांना दंडाची शिक्षा सुनावली.

दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या लोकअदालतीत ओतूर पोलीस ठाण्याकडील एकूण नऊ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामध्ये मोटार वाहन कायदा कलम १८५ अंतर्गत दाखल सहा प्रकरणांमध्ये प्रत्येकी १० हजार रुपये, तर भारतीय न्याय संहिता कलम २८५ व २८१ अंतर्गत दाखल तीन प्रकरणांमध्ये प्रत्येकी ५०० रुपये दंड ठोठावण्यात आला. या नऊ प्रकरणांतून एकूण ६१ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. लोकअदालतीत दंड झालेल्या प्रकरणांमध्ये राजू उत्तम राठोड, गणेश ज्ञानदेव भापकर, मिलिंद सुनील औटी, भिमा शंकर वाजे, रामभाऊ हरिभाऊ काळे व तेजस राजेंद्र कोंडे यांचा मोटार वाहन कायदा कलम १८५ अंतर्गत समावेश आहे. तसेच सदाशिव लक्ष्मण लांडगे यांच्यावर कलम २८५, तर अंकुश बाळाशीराम लोहोटे व सौरभ संतोष भिसे यांच्यावर कलम २८१ अंतर्गत प्रकरणे दाखल होती.

तसेच दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी ओतूर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. २४५/२०२६, मोटार वाहन कायदा कलम १८५ अंतर्गत दाखल प्रकरणात आरोपी राजेश रामदास बुरकुल (वय ३३, रा. बोऱ्हाडेवाडी, मोशी, ता. हवेली, जि. पुणे) यांनी न्यायालयात गुन्हा कबूल केला. त्यानंतर मा. जैन, जे.एम.एफ.सी. कोर्ट, जुन्नर यांच्या न्यायालयाने त्यांना १० हजार रुपये द्रव्यदंडाची शिक्षा सुनावली.

सदर प्रकरणाची सुनावणी संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ६५६/२०२६ अंतर्गत झाली. सरकारी वकील एस. एस. अवचर, ए.पी.पी. यांनी शासनाच्या वतीने काम पाहिले. ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक संदिपसिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक शुभमकुमार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर विभाग धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि ज्ञानेश्वर बाजगिरे, पोलीस हवालदार नामदेव बांबळे, पोलीस शिपाई श्यामसुंदर जायभाये, पोलीस शिपाई किशोर बर्डे व पोलीस शिपाई अतुल भेके यांनी केली.

## केसांच्या समस्यांचे मूळ स्कॅल्पमध्ये

### 'केश किंग'ची 'स्कॅल्प फर्स्ट' संकल्पना

■ पुणे (दै. संध्या)

केसांचे गळणे, डॅन्ड्रफ, कोरडेपणा, केसांचे नुकसान आणि इतर त्रासांच्या समाधानासाठी हेअर-केअर प्रोडक्ट्स आणि ब्रँड्सची संख्या तर बाजारात सतत वाढत आहे. परंतु, आजसुद्धा ग्राहक केसांच्या समस्यामुळे पूर्वीपेक्षा जास्त चिंतित आहेत. मग, इतके सर्व उपाय असूनसुद्धा समस्यांपासून मुक्तता का मिळत नाही?

एखादवेळेस आपण समस्यांच्या मुळापर्यंत न जाता, फक्त वरवरचे त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न करते आहोत.

स्कॅल्पच तो आधार आहे, जिथून निरोगी केसांची सुरुवात होते, केसांच्या दररोजच्या काळजीत आपण बहुतेक वेळा याकडे दुर्लक्ष करतो. ही गरज पूर्ण करण्यासाठी, ईमामी लिमिटेडच्या परिवाराचे हेअर-केअर ब्रँड केश किंग सादर करीत आहे स्कॅल्प फर्स्ट - एक खास स्कॅल्प-केअर रेंज, जे पुरुष आणि महिला, दोघेही वापरु शकतात. हे एका साधारण कल्पनेच्या आधारावर तयार करण्यात आले आहे: स्कॅल्प फर्स्ट आत्मसात करा, सुदंर केस मिळवा.



निरोगी केसांची सुरुवात अचूक पायाने होते. स्कॅल्प म्हणजे एक पृष्ठभाग नाही, ज्यावर केस उगवतात. ते स्वतःमध्ये एक वातावरण आहे. त्याचे स्वतःचेच एक नैसर्गिक pH - बॅलेन्स आहे, जे एक निरोगी स्कॅल्प वातावरण कायम ठेवण्यात महत्त्वाची भुमिका बजावतो. जेव्हा हे संतुलन बिघडते, तेव्हां जास्तं तेल साचण्याची, कोरडेपणाची, खाजयेण्याची, फ्लेकिंगची आणि अस्वस्थतेसारख्या समस्यांची शक्यता वाढते. या समजूतीच्या आधारावर केश किंगने केसांच्या समस्यांची दृष्टीस येणाऱ्या लक्षणांसह स्कॅल्पच्या काळजीवर सुद्धा महत्त्व दिले आहे. एका निरोगी स्कॅल्पचे वातावरण तयार करण्यासाठी स्कॅल्पचे pH बॅलेन्स कायम ठेवणे एक महत्त्वाचे पहिले पाऊल आहे. ह्या तत्त्वावर आधारित स्कॅल्प फर्स्ट तयार करण्यात आले आहे.

दोन वेगवेगळ्या व्यक्तींचे स्कॅल्पसुद्धा वेगळे असतात - याच विचाराच्या आधारावर ब्रँडने फक्त स्कॅल्पच्या देखरेखीसाठी काही खास तयार केले आहे, अगदी तसेच जसे स्किनकेअर रूटीन, त्वचेचे वेगवेगळे प्रकार आणि गरजा लक्षात घेऊन बनवले जाते.

दोन विविध प्रकारचे स्कॅल्प. एक स्कॅल्प फर्स्ट विचारसरणी.दोन खास रेंजसह या ब्रँड बाजारात सादर करण्यात येत आहे: ऑइली स्कॅल्प रेंज - या रेंजमध्ये Detoxyscalp™ सह मोरिंगा आणि ॲपल सायडर व्हिनेगरचासुद्धा समावेश आहे. Detoxyscalp™ एक विशेष, घटक आहे जे ऑइली स्कॅल्पला शुद्ध करण्यास आणि बॅलेन्स परत आणण्यास मदत करतो आणि याशिवाय सीबम, मुळामध्ये साचलेले तेल, खाज आणि फॉलिकल्सचे बंद होणे थांबवतो. ड्राय स्कॅल्प रेंज मोरिंगा, डाळिंब आणि Scalpcalmin™ने समृद्ध आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### अपूर्व जगताप याची दमदार कामगिरी; कांस्य व रौप्यपदकाची कमाई

पिंपरी : दैनिक संध्या

५५ व्या केंद्रीय विद्यालय राष्ट्रीय स्कूल स्पोर्ट्स मीट २०२६-२७ स्पर्धेत अपूर्व जगताप याने उल्लेखनीय कामगिरी करत दोन पदके जिंकून शहराचा गौरव वाढवला आहे. केरळ राज्यातील एर्नाकुलम येथे संपन्न झालेल्या या राष्ट्रीय स्पर्धेत अपूर्वने १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत कांस्यपदक पटकावले. याशिवाय, (४×१०० मीटर) रिले स्पर्धेत उत्कृष्ट सांघिक कामगिरी करत त्याने रौप्यपदकावरही आपले नाव कोरले. राष्ट्रीय स्तरावरील या यशामुळे क्रीडा क्षेत्रात त्याच्या मेहनतीची आणि सातत्यपूर्ण सरावाची दखल घेतली जात आहे. अपूर्व जगताप गेली अनेक वर्षे साई स्पोर्ट्स अकॅडमीमध्ये प्रशिक्षक चंद्रशेखर कुदळे यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करत आहे. त्यांच्या प्रशिक्षणाखाली अपूर्वने यापूर्वीही विविध जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अपूर्वच्या या यशाबद्दल त्याचे प्रशिक्षक, कुटुंबीय तसेच क्रीडाप्रेमींनी त्याचे अभिनंदन केले असून भविष्यातही तो राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### हा केवळ अर्ज नाही हा समानतेच्या हक्काचा संघर्ष आहे : डॉ.अम्रपाली मोहिते

कोरेगावमुळ : दैनिक संध्या

प्रभाग समितीमध्ये स्वीकृत सदस्य म्हणून संधी मिळावी, यासाठी अनेकांनी अर्ज केले. त्यामध्ये सावली सोशल फाउंडेशन या संस्थेचा आणि माझा — तृतीयपंथी सामाजिक कार्यकर्ती डॉ. अम्रपाली मोहिते यांचा अर्ज आज पात्रता यादीमध्ये समाविष्ट झाला आहे. ही केवळ एका नावाची नोंद नाही, हा अनेक वर्षांपासून वंचित राहिलेल्या तृतीयपंथी समाजाच्या प्रतिनिधित्वाच्या हक्काच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. अर्ज भरताना सुरुवातीला फॉर्ममध्ये केवळ 'स्त्री' आणि 'पुरुष' असे दोनच पर्याय उपलब्ध होते. मात्र, संविधानाने दिलेले समानता, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेचे अधिकार तसेच तृतीयपंथी व्यक्तींनाही समाजाचा अभिन्न घटक म्हणून लोकशाहीच्या प्रत्येक प्रक्रियेत सहभागी होण्याचा समान अधिकार आहे, ही भूमिका वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर संवैधानिक पद्धतीने मांडली. संवाद झाला, भूमिका समजावून सांगितली, आणि फॉर्ममध्ये आवश्यक दुरुस्ती करण्यात आली. त्यानंतर अर्ज भरला आणि आज त्या पात्रता यादीमध्ये माझे नाव समाविष्ट झाले आहे. हा शेवट नाही ही पुढच्या प्रवासाची सुरुवात आहे. आता अपेक्षा एवढीच—निवडप्रक्रियेत कोणताही राजकीय पक्षपात होऊ नये, कोणत्याही लिंगाच्या आधारावर भेदभाव होऊ नये आणि सामाजिक वंचिततेचा विचार करून तृतीयपंथी समाजालाही प्रतिनिधित्वाची संधी मिळावी. कारण प्रतिनिधित्व म्हणजे केवळ एका व्यक्तीला दिलेली जागा नाही, प्रतिनिधित्व म्हणजे वर्षानुवर्षे मुख्य प्रवाहापासून दूर ठेवलेल्या समाजाला लोकशाहीच्या प्रवाहात सन्मानाचे स्थान देणे. संविधानाने आम्हाला केवळ ओळख दिली नाही, तर समानतेने जगण्याचा आणि निर्णयप्रक्रियेत सहभागी होण्याचा अधिकारही दिला आहे. आज पात्रता यादीत आलेले हे नाव माझे एकट्याचे नाव नाही, हे त्या प्रत्येक तृतीयपंथी व्यक्तीच्या स्वाभिमानाचे प्रतीक आहे, ज्याला समाजाच्या मुख्य प्रवाहात सन्मानाने उभे राहायचे आहे. लढा व्यक्तीचा नाही, लढा समान प्रतिनिधित्वाचा आहे. आणि मार्ग — केवळ संविधानाचा सावली सोशल फाउंडेशन संस्थापिका / अध्यक्षा सप्तरंगी आई डॉ.अम्रपाली मोहिते यांनी सांगितले.



### शिरूर शहरात जुन्या भांडणातून गोळीबार; तरुणाचा मृत्यू

कवठे येमाई : दैनिक संध्या

शिरूर शहरातील लाटेआळी परिसरातील आंबेडकरनगर येथे जुन्या भांडणाच्या रागातून ३३ वर्षीय तरुणावर गोळीबार करून लोखंडी पाईपने मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात हरीश ऊर्फ हरी दादाभाऊ गंगावणे याचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी शिरूर पोलिस ठाण्यात रोहित रविंद्र सोनवणे (२६, रा. करडे, ता. शिरूर), अनिकेत विलास गव्हाणे (२३) आणि आदित्य पवार (दोघे रा. गव्हाणवाडी, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हरीश गंगावणे याचे आरोपींसोबत पूर्वीपासून भांडण होते. या जुन्या वादातून आरोपींनी त्याच्यावर हल्ला केल्याचे समोर आले आहे. घटनेनंतर हरीश याला उपचारासाठी नेण्यात आले; मात्र त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच शिरूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. दोन पिस्तुले व एक जिवंत काडतूस पोलिसांनी जप्त केले असून, फॉरेन्सिक पथकानेही घटनास्थळाची पाहणी केली आहे.या घटनेमुळे शिरूर शहरात खळबळ उडाली असून आरोपींच्या शोधासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### हात-पाय बांधून तीन तोळ्यांचे दागिने व ५० हजार रोकड लंपास

कवठे येमाई : : दैनिक संध्या

शिरूर तालुक्यातील आमदाबाद येथे घरात झोपलेल्या ज्येष्ठ महिलेवर हल्ला करून चोरट्यांनी दागिने व रोकड लुटल्याची घटना घडली. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात दोन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अहमदाबाद येथील ठकुबाई थोरात या घरात झोपलेल्या असताना रात्री दीड वाजण्याच्या सुमारास दोन चोरट्यांनी घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी ठकुबाई यांना कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण करत, "तुमच्याकडे काय आहे ते पटकन दे," अशी धमकी दिली.घाबरलेल्या ठकुबाई यांनी घरातील पेटी व कपाटामध्ये ठेवलेले तीन तोळ्यांचे दागिने आणि ५० हजार रुपये रोख चोरट्यांना दिले.

## पुरंदर नागरी पतसंस्थेची सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न

■ सासवड (दै. संध्या)

सहकारमहर्षी स्व. चंदुकाका जगताप यांनी स्थापन केलेली पुरंदर नागरी सहकारी पतसंस्था स्थापनेपासून कोणत्याही बँकेचे कर्ज न घेता, स्वभांडवलावर भक्कमपणे उभी आहे. संस्थेच्या सर्व शाखा स्वमालकीच्या जागेत असून सर्व शाखा एकमेकांशी संगणकप्रणालीने जोडल्या असून ही संस्था, सभासदांनी संस्थापक स्व. चंदुकाका जगताप आणि अध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांच्यावर विश्वास ठेवून वाढवली. त्यामुळे पुरंदर नागरी सहकारी पतसंस्थेची वाटचाल नागरी सहकारी बँकेकडे सुरू असून, यापुढेही असाच विश्वास ठेवावा, असे आवाहन संचालक मंडळाच्या वतीने संस्थेचे मार्गदर्शक व माजी आमदार संजय जगताप यांनी केले. सासवड (ता. पुरंदर) येथील पुरंदर नागरी सहकारी पतसंस्थेची ३८वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि. २०)




**पतसंस्थेची नागरी बँकेकडे वाटचाल सुरू**

सासवड येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात उपाध्यक्ष कृष्णा शेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली आणि माजी आमदार संजय जगताप, जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे, संत सोपानकाका सहकारी बँकेचे अध्यक्ष रमणिकलाल कोठडिया, सी.ए.प्रा. डॉ.एम.एस. जाधव यांसह सर्व संचालक मंडळाच्या उपस्थितीत विद्येची देवता देवी सरस्वती आणि संस्थेचे संस्थापक स्व. चंदुकाका जगताप यांच्या प्रतिमापूजनाने आणि दिपप्रज्वलनाने झाली. संचालक अनिल कामठे यांनी स्वागत, डॉ. विनायक खाडे यांनी प्रास्ताविक तर सरव्यवस्थापक अनिल उरवणे यांनी अहवालवाचन केले. सहकार विभागाचे एस.बी. वाटाणे यांनी सभासदांना प्रशिक्षण दिले. या वार्षिक सभेत विविध विषयांवर खुली चर्चा झाली. यामध्ये रविंद्रनाथ ताकवले, नंदकुमार जगताप, मार्तंड भोंडे, माणिक चोरमले, संदीप फडतरे, शहाजी सस्ते, आनंद भोसले, विठ्ठल मोकाशी, दीलीप गिरमे, गौतम बेंगाळे, बाबासो जगताप, दामोदर कदम, शिवाजीराव ढमढेरे, प्रदीप पोमण, संजय रूढ आदी सभासदांनी चर्चेत सहभाग घेतला व आपले विचार मांडले.

संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा लेखाजोखा मांडताना माजी आमदार जगताप यांनी सांगितले की , ३१ मार्चअखेर संस्थेच्या १३ शाखा, १५ हजार ४३६ सभासद, ३९० कोटी ४० लाखांच्या ठेवी, सात कोटी ३७ लाखांचे वसूल भागभांडवल, १४ कोटी २० लाखांचा इतर निधी, १०९ कोटी एक लाखाची गुंतवणूक, २१४ कोटी ६० लाख रुपयांचे कर्ज वाटप असून एक कोटी २६ लाख ९ हजार रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. संस्थेचा ऑडिट वर्ग सतत 'अ' राहिला असून यंदाही संस्थेने सभासदांना १० टक्के लाभांश वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. याप्रसंगी संचालक अंकुश जगताप, राजेश इंदलकर, युगंधरा कोंढरे, बाबासाहेब चौंडकर, चंद्रकांत बोरकर, परशुराम तांबे , सूर्यकांत कांबळे, अमोल सातभाई , ॲड. किशोर म्हस्के, पोपटराव सोनवणे , भारती देशमुख, व्यवस्थापक सतीश शिंदे, हरिभाऊ शिंदे आदी उपस्थित होते. सभेत सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा, तसेच शाखा व्यवस्थापक संजय बडदे या कर्मचाऱ्याचा सेवापूर्तीनिमित्त विशेष गौरव करण्यात आला. नंदकुमार सागर यांनी सूत्रसंचालन केले, तर संचालक आनंदराव घोरपडे यांनी आभार मानले. सभा अत्यंत खेळीमेळीत संपन्न झाली.

## मीना शाखा कालव्याच्या टेल भागाला पाण्याची प्रतीक्षा - आवर्तन सुरू होऊन पंधरवडा उलटला

■ कवठे येमाई (दै. संध्या)



मीना शाखा कालव्याचे खरीप २०२६ चे आवर्तन ३ सप्टेंबरपासून सुरू होऊन पंधरवडा उलटला, तरी टाकळी हाजी, म्हसेसह टेल भागातील शेतकऱ्यांना अद्याप पाण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. पावसाने दडी मारल्याने बाजरी, सोयाबीन, डाळिंब, फळबागा तसेच जनावरांच्या चाऱ्याची पिके पाण्याअभावी धोक्यात आली आहेत.त्यातच भर म्हणजे या कालव्यास कमी दाबाने पाणी सोडल्याने टाकळी हाजी, म्हसे परिसरातील पिके जळण्याच्या मार्गावर असून शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे.

आवर्तन 'टेल टू हेड' पद्धतीने सुरू करण्यात आले असले, तरी कालव्यात कमी दाबाने पाणी सोडले जात असल्याने ते अत्यंत संथगतीने पुढे सरकत असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. त्यामुळे टेल भागापर्यंत पाणी पोहोचण्यास आणखी विलंब होण्याची भीती व्यक्त होत आहे.पावसाअभावी विहिरी व कूपनलिकांचे पाणी पातळी खालावली असून, कालव्याचे पाणी टेल पर्यंत पोहोचल्यास पिकांना दिलासा मिळण्यासोबतच विहिरींच्या पाणीपातळीत वाढ होण्याची अपेक्षा आहे. टाकळी हाजी शाखेंतर्गत आठ पाणी वापर संस्था असून, त्यांच्या पदाधिकाऱ्यांसह शेतकऱ्यांकडून तातडीने पाणी सोडण्याची मागणी होत आहे. १० सप्टेंबर रोजी शाखाधिकारी के. एस. वडमारे व संबंधित कर्मचाऱ्यांशी चर्चा करून पाणी नियोजनाबाबत मागणी करण्यात आली होती. मात्र, अपेक्षित पाणी अद्याप मिळाले नसल्याचे सांगण्यात येत आहे. "टाकळी हाजीसह टेल भागातील शेतकऱ्यांना तातडीने पुरेसे पाणी मिळावे, यासाठी उपअभियंता सचिन शिंदे यांच्याशी वारंवार संपर्क साधून मागणी केली जात आहे,"

## कवठे येमाईत घरासमोरून ७० हजारांची दुचाकी चोरी

■ कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथे घरासमोर हँडल लॉक करून पार्क केलेली होंडा कंपनीची मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १४ सप्टेंबर रोजी रात्री १० वाजता ते दि. १५ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान फिर्यादी यांच्या राहत्या घरासमोर होंडा कंपनीची ग्रे रंगाची मोटारसायकल (क्र. MH-12-ZJ-0982) हँडल लॉक करून पार्क करण्यात आली होती.

मात्र, सकाळी मोटारसायकल जागेवर नसल्याचे निदर्शनास आले. अज्ञात व्यक्तीने फिर्यादी यांच्या संमतीशिवाय सुमारे ७० हजार रुपये किमतीची मोटारसायकल चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी दि. १६ रोजी दुपारी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पो.ह. उबाळे करीत असून, चोरीस गेलेली मोटारसायकल तसेच अज्ञात आरोपीचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे.



## जेजुरी ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने विविध उपक्रमांसाठी जागा खरेदी

■ जेजुरी (दै. संध्या)

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत जय मल्हार ज्येष्ठ नागरिक संघ जेजुरी ही संघटना कार्यरत असून उपक्रमशील संघटना म्हणून या संघटनेचे राज्यात नाव आहे.जेजुरी शहरातील ज्येष्ठ नागरिक भवनाच्या समोर विविध उपक्रमासाठी संघटनेच्या वतीने जागा खरेदी करण्यात आली असल्याचे संघटनेचे अध्यक्ष शामकाका पेशवे यांनी सांगितले.

2001 साली जेजुरीत जयमल्हार ज्येष्ठ नागरिक संघटना स्थापन झाली. 2010 साली खासदार शरद पवार यांच्या निधीतून जेजुरी येथील होळकर तलावाकाठी दोन मजली इमारत उभारण्यात आली. या ज्येष्ठ नागरिक भवनात वर्षभर व्याख्याने,आरोग्य शिबिरे, गुणवंत विद्यार्थी व व्यक्तींचे सन्मान, ग्रंथालय, विविध स्पर्धा, दशक्रिया विधी निमित्त कार्यक्रम आदी उपक्रम राबविले जातात. ही जागा कमी पडत असल्याने




जेजुरी व पंचक्रोशीतील दशक्रिया विधी निमित्त होणारे कार्यक्रम,छोटे मोठे कार्यक्रम आदी कार्यक्रमासाठी ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने नुकतीच जागा खरेदी करण्यात आली असून लवकरच लोक सहभागातून नवीन इमारत बांधण्यात येणार असल्याचे पेशवे यांनी सांगितले. जेजुरी जयमल्हार ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष श्यामकाका पेशवे, उपाध्यक्ष पांडुरंग कोरपड, श्रीमती उषाताई आगलावे, सचिव मोहिनी धोत्रे, नंदकुमार निरगुडे, सुरेश पवार , सुहास बारभाई, आनंदराव जगताप ,हरिश्चंद्र कराळे, बाबुराव जगताप, सयाजी मोहरकर, माणिक पवार आदी सभासदांच्या प्रयत्नाने ही जागा खरेदी करण्यात आली आहे.

## राजुरी विद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

■ नायगाव : (दै. संध्या)

अक्षर सृष्टी संस्थेचे अध्यक्ष सिद्धनाथ पवार यांच्या माध्यमातून पुरंदर तालुक्यातील राजुरी माध्यमिक विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप नुकतेच करण्यात आले. शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण दिसून आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्येची आराध्य देवता सरस्वती तसेच स्वर्गीय नामदार चंदूकाका जगताप यांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा पत्रकार आणि नायगाव विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे विद्यमान अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ सहशिक्षिका सुजाता पैठणकर यांनी केले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. मान्यवर व ग्रामस्थांच्या हस्ते विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.



यावेळी राजुरी ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विपुल भगत यांनी मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अशा उपक्रमांतून मिळणाऱ्या प्रोत्साहनाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना,"दहावीच्या विद्यार्थ्यांनी मन लावून अभ्यास करून विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागण्यासाठी प्रयत्न करावेत. भविष्यात चांगले नाव कमवावे. आपल्या आई-वडिलांसह शिक्षकांचे योगदान कधीही विसरू नये आणि जीवनात प्रामाणिकपणा जपावा," असे आवाहन केले. विविध उदाहरणे देत त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमास पत्रकार रियाज सय्यद, राजुरी ग्रामपंचायतीचे उपसरपंच संपत चोरघडे, माजी उपसरपंच विपुल भगत, सचिव तात्या गायकवाड, माजी तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष बाळासाहेब भगत, जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेचे अध्यक्ष पोपट भगत, सामाजिक कार्यकर्ते दिलीप शिवरकर, राजुरी विकास सोसायटीचे संचालक अशोक भगत, ज्येष्ठ सहशिक्षिका सुजाता पैठणकर, कल्पना जगताप, श्रद्धा इथापे, सहशिक्षक गणेश कोलते, संगीता चव्हाण तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

## 'भारत माता भवन'च्या वास्तुवृद्धीचा शुभारंभ

■ पिंपरी (दै. संध्या)

चिंचवड येथील स्वर्गीय तात्या बापट स्मृती समिती संचलित 'भारत माता भवन'च्या वास्तुवृद्धीचा (इमारतीवर दोन नवीन मजले) बांधण्याच्या कामाचा शुभारंभ खासदार श्रीरंग बारणे यांच्या शुभहस्ते रविवारी पार पडला. या वास्तूच्या विस्तारासाठी बारणे यांनी खासदार निधीतून ५० लाख रुपयांचा निधी दिला असून, आवश्यकतेनुसार अतिरिक्त निधी देण्याची ग्वाहीदेखील खासदार बारणे यांनी या वेळी दिली.

यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाहक मुकुंदराव कुलकर्णी, प्रांत संपर्क प्रमुख मिलिंदराव देशपांडे, पिंपरी-चिंचवड शहर संघचालक विनोद बन्सल, संघ अधिकारी विनायकराव थोरात, महापालिकेच्या 'ब' प्रभागाचे अध्यक्ष मंदार देशपांडे, प्रकल्प आर्किटेक्ट उदय कुलकर्णी, जयदीप खापरे, रवी नामदे, उदय हळदीकर उपस्थित होते.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रेरणेने कार्यरत असलेल्या तात्या बापट स्मृती केंद्राचे कार्य अत्यंत उल्लेखनीय असल्याचे सांगत खासदार बारणे म्हणाले, 'पूर्वांचल राज्यातील विद्यार्थ्यांना येथे आणून त्यांच्यावर उत्तम संस्कार केले जातात. भारतीय संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याचे मोठे कार्य या माध्यमातून होत आहे. देशाची अखंडता आणि राष्ट्रीय एकात्मता दृढ करण्यासाठी ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासून मोलाचे योगदान देत आहे'. 'या वसतिगृहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आणि राहण्याचा सर्व खर्च उचलून त्यांना दर्जेदार शिक्षण दिले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने देशातील आदिवासी भाग आणि पूर्वांचल राज्यांच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. त्याच धर्तीवर मावळ लोकसभा मतदारसंघातील आदिवासी घटक आणि सामाजिक संस्थांना सातत्याने सहकार्य केले जात आहे. यापूर्वीही कर्जत तालुक्यातील आदिवासी भवनासाठी ५० लाखांचा निधी देण्यात आला होता, तसेच संस्थेला ॲम्ब्युलन्सदेखील उपलब्ध करून देण्यात आल्याचे'. खासदार बारणे यांनी सांगितले.